# शासकीय अध्यापक महाविद्यालय
# पनवेल

## आदर्श शिक्षक विशेषांक

# गुरुवंदना

## वाङ्मय मंडळ २०२४-२५







संपादक
प्रा.डॉ.बी.जी खाडे

# आदर्श शिक्षक विशेषांक
## २०२४-२५

## • संपादक मंडळ •



प्राचार्य-रमा भोसले



संपदाक - प्रा. डॉ. बी. जी. खाडे

## सहसंपादक



श्रीमती दर्शना भोवर



श्रीमती उषा लोणे



श्रीमती सविता वाघे



श्रीमती हर्षला पाटील

(टीप- या अंकात व्यक्त झालेली मते निबंध लिहिणाऱ्यांची वैयक्तिक आहेत.संपदाक मंडळ यांच्याशी सहमत असेलच असे नाही.)


5:41 pm

# प्रस्तावना



भारतीय संस्कृतीत असे मानले जाते की, ज्याला गुरु नाही त्याला गती नाही. गुरुचे स्थान हे परमेश्वरापेक्षाही मोठे आहे म्हणूनच पहिला नमस्कार हा गुरूला असतो. जीवनाला आकार देणाऱ्या गुरुचे पूजन गुरुपौर्णिमेच्या दिवशीच किंवा शिक्षक दिनाच्या दिवशीच नव्हे तर नित्य करावे.

**गुरुविण नाही' दुजा आधार**

**रडता, पडता, कोठे अडता, तो नेतसे पार'!**

आपल्याला ज्ञान देतो, सन्मार्ग दाखवतो तो गुरु. आपले कुठे चुकले कुठे अडले तर त्यावेळी योग्य मार्ग दाखवतो तो गुरु. म्हणूनच भारतीय संस्कृतीत गुरु-शिष्य परंपरेला अतिशय महत्त्व आहे. अध्यात्मापासून विज्ञानापर्यंत गुरु या शब्दाचे मोल फार मोठे आहे. ज्याला गुरु नाही त्याला प्रत्यक्ष परमेश्वराचाही आधार नाही अशी आपली संस्कृती मानते म्हणूनच प्रत्येक दिवशी गुरुचे स्मरण आणि पूजन याला खूप महत्त्व आहे.

पुरणकाळापासून गुरुच्या पूजेचे मोठे महत्त्व आहे. असे म्हणतात की, भगवान दत्तात्रयांनाही २४ गुरु आहेत. त्यांनी अविश्रांत, न कंटाळता परिश्रम करण्याची मुंगीची प्रवृत्ती पाहून तिलाही गुरू मानले. म्हणूनच 'जो जो ज्याचा घेतला गुण तो तो म्या गुरु केला जाणा' अशी शिकवण पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. आपल्या परंपरेत गुरु शिष्यांच्या काही प्रसिद्ध जोड्या होऊन गेल्या कृष्ण - अर्जुन, घेण्यात ऋषी - आरुणि, द्रोणाचार्य - एकलव्य यांपासून रामकृष्ण परमहंस - विवेकानंद अशा काही गुरु शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. त्यातल्या प्रत्येक शिष्याने आपल्या गुरुवरची निष्ठा भक्ती कोणत्या ना कोणत्या रूपाने व्यक्त केली.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस "शिक्षक दिन" म्हणून साजरा केला जातो. शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. आई-वडील हे आपल्या आयुष्यातील सर्वात पहिले गुरु असतात. शालेय जीवनात आपणास अनेक गुरु भेटतात, गुरु आपणास चांगल्या जीवनाची वाट दाखवतात. आपल्या आयुष्यात गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरूंचा आदर राखणे आपले कर्तव्य आहे आपल्या देशात गुरूंचे महत्त्व हे ईश्वरासमान आहे.

५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल मधील वाङमय मंडळातील प्रशिक्षणार्थी आपणा सर्वांसमोर आदर्श शिक्षक विशेषांक 'गुरुवंदना' सादर करत आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातले गुरुचे स्थान हे मोलाचे आहे. देशाच् कर्तव्यदक्ष, तत्पर व सृजनशील नागरिक घडवण्यात शिक्षकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. जीवनाच्या प्रत्येक वाटेवर लाभलेल्या शिक्षकाची छाप आपल्यावर पडत असते. आणि याच भावना प्रकट करण्यासाठी १६ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयात "माझे आदर्श शिक्षक" या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा प्रथम वर्ष छात्राध्यापकांसाठी घेण्यात आली होती. स्पर्धेला सर्व छात्र अध्यापकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेतील निबंधाचे वाङमय मंडळ छात्र अध्यापकांकडून परीक्षण करण्यात आले. काही निवडक निबंध या विशेषांकात सादर करण्यात आले आहेत. छात्राध्यापकांना आपल्या आयुष्यात लाभलेले शिक्षक, त्यातील त्यांचा आदर्श शिक्षक व त्यांच्या आदर्शामुळे त्यांचे स्वतःचे आयुष्य कसे घडले, आदर्श शिक्षकांचा त्यांच्या आयुष्यातील प्रभाव छात्राध्यापकाने अतिशय भावनिकरित्या आपल्या निबंधातून प्रकट केल्या आहेत. जीवनात पुढे जात असताना, अनेक समस्यांना सामोरे जात असताना मागे वळून पाहिल्यास असे अनेक शिक्षक आपल्या स्मरणात राहतात, ज्यांच्यामुळे आपण इथपर्यंत येऊन पोहोचलो. अशाच काही आपल्या आदर्श शिक्षकांबद्दलच्या भावना महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या छात्राध्यापकांनी आपल्या निबंधाच्या माध्यमातून प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे हे काही निवडक निबंध आपणा सर्व वाचकांसमोर सादर करताना खूप आनंद होत आहे.

**संपादक- प्रा. डॉ. बी. जी.खाडे.**

# अनुक्रमणिका

| अ. क्र. | छात्रध्यापकांची नावे | हजेरी क्रमांक |
|---|---|---|
| १ | पायल ननवरे (प्रथम क्रमांक ) | २५ |
| २ | सिद्धी मुसळे ( द्वितीय क्रमांक | २३ |
| ३ | संकेत तोरसकर ( तृतीय  क्रमांक ) | ३४ |
| ४ | सविता वाघे | ३६ |
| ५ | उषा लोणे | १८ |
| ६ | सविता मुळीक | २२ |
| ७ | नितेश कोरडा | १६ |
| ८ | रोहिणी पठाडे | २७ |
| ९ | दर्शना भोवर | २ |
| १० | सायली जाधव | १२ |
| ११ | नितेश चौरे | ३ |
| १२ | प्रतिभा जाधव | ११ |
| १३ | स्नेहलता पाटील | २९ |
| १४ | अंकुर गोविंद | १० |

# "माझे आदर्श शिक्षक "



**' श्रीमती. रचना साठे मॅडम.'**

**'को. ए. सो. केशवजी वीरजी कन्या विद्यालय पनवेल.'**

मुलांना शिक्षक म्हटले की त्यांच्यासमोर एक चित्र उभा राहते चिडचिड करणारे, खडूस, अभ्यास न केल्यास ओरडणारे, मारणारे परंतु तसे नाही. प्रत्येक शिक्षक तसे नसतात. अनेक शिक्षक असे आहेत की ज्यांचा आपण आदर्श घेतला पाहिजे. शिक्षक म्हटल्यावर तो “शीलवान”, “क्षमावान” व “कर्तृत्ववान” असा असायला पाहिजे. त्याच्याकडे हे सर्व गुण पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये शिक्षकाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या आयुष्यात आई वडील हे आपले पहिले गुरू असतात. व शिक्षक हे दुसरे. ते आपल्यावर चांगले संस्कार करतात. ते आपल्याला स्वप्न पाहायला शिकवतात व ते स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी आपल्याला पाठिंबा देतात, मदत करतात, सहकार्य करतात ते आपल्याला समाजात वावरायला शिकवतात.

अशीच मला लाभलेल्या शिक्षकांपैकी एक शिक्षिका म्हणजे मा. रचना साठे मॅडम. मला लाभलेल्या शिक्षकांपैकी एक आदर्श म्हणून मी त्यांना पाहते. ज्यांच्यामध्ये अनेक गुण होते. त्या अतिशय हुशार, प्रेमळ, कर्तृत्ववान, कष्टाळू आणि आमच्या शाळेतील वयाने सर्वात लहान शिक्षिका होत्या. मी इयत्ता ६वी मध्ये असताना त्या आमच्या शाळेत पहिल्यांदा आल्या होत्या व कामासाठी आमच्या शाळेत रुजू झाल्या होत्या.

मी इयत्ता ७वी मध्ये असताना त्या आमच्या वर्गशिक्षिका झाल्या होत्या. त्या आम्हाला मराठी व इंग्रजी हा विषय शिकविण्यासाठी होत्या. त्यांचे भाषेवर खूप छान प्रभुत्व होते. त्या खूप सकारात्मक होत्या. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर एक सकारात्मकतेची भावना आम्हा विद्यार्थ्यांमध्ये जागायची. त्या खूप आत्मविश्वासू होत्या. व हे त्यांच्या चेहऱ्यावरून आम्हाला जाणवायचे त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकण्यास खूप मदत केली. त्यांची पद्धत मला खूप आवडायची.

साठे मॅडम शिकवताना प्रत्येक ओळीचा अर्थ समजावून सांगत. प्रत्येक शब्दाचा अर्थ त्या लिहून घ्यायला सांगत असे. आज मला जे काही इंग्रजी वाचता, लिहिता येते व समजते ते सर्व त्यांच्यामुळे. त्यांनी आमच्या वर्गात एक उपक्रम राबवला होता. इंग्रजीचे रोज जे काही शिकवले जाईल त्यातील अनोळखी ५ शब्द रोज ५ वेळा वाचन करत लिहायचे. यामुळे आपल्याला रोज नवीन शिकण्यात येणाऱ्या शब्दाची ओळख होत असे व त्याचा अर्थ ही लक्षात राहत असे. व हे काम आमच्याकडून होत आहे की नाही याची ही त्या खबरदारी घेत असे. त्यांनी प्रत्येक ओळीमध्ये एका विद्यार्थ्याची ते तपासून घेण्यासाठी नेमणूक केली होती की प्रत्येक जण ते करत आहे की नाही यासाठी व तसेच त्या नेमणूक केलेल्या विद्यार्थ्याची वही मॅडम स्वतः हा पाहत असे. दर शनिवारी त्या अनिश्चितपणे कोणताही हजेरी क्रमांक घेऊन त्या विद्यार्थ्याची वही त्या पाहत असे. अशा प्रकारे त्यांनी आमच्याकडून हा उपक्रम करून घेतला व आम्हाला एक चांगली सवय लावली.

ज्या विद्यार्थ्यांना शिकत असताना काही अडचणी येत असत किंवा एखादा विषय शिकण्यास कठीण जात असेल तर त्या विद्यार्थ्याला जो विद्यार्थी त्या विषयात हुशार आहे त्याच्या बाजूला बसवत व त्या विद्यार्थ्याला विषयात काय अडचण आहे हे विचारण्यास प्रवृत्त करत व तो हुशार विद्यार्थी कशा प्रकारे त्या विषयाचा अभ्यास करतो याचे मार्गदर्शन त्या घडवून आणत असे. व त्यामुळे त्या विद्यार्थ्यांमध्ये काही फरक पडतो का ते त्या पाहत होत्या. म्हणजे यावरून त्या सर्व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत होते.

माझ्यामध्येही त्यांच्यामुळे अनेक बदल झाले. त्या माझ्यासाठी आदर्श होत्या. व मी त्यांना आदर्श मानण्याचे एक कारण आहे. मी अगोदरपासून शाळेत जास्त हुशार नव्हती. त्यांना भेटण्याअगोदर मी कोणत्याही गोष्टीमध्ये आवड दाखवत नव्हती. माझ्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात न्यूनगंड भरलेला होता मला प्रत्येक गोष्टीची भीती वाटायची. मी एका साधारण विद्यार्थ्यांप्रमाणे रोज डब्बा घेऊन शाळेत जायचं, तासाला बसायचं, डब्बा खायचा आणि शाळा सुटल्यावर घरी यायचं. घरी आल्यानंतर दिलेला तेवढाच अभ्यास करायचा व झोपायची असाच माझा दिनक्रम होता.

एक दिवस नेहमीप्रमाणे मी शाळेत गेली. त्या वेळेस साठे मॅडम आम्हाला मराठी शिकवत होत्या. मराठीच्या तासाला आल्यानंतर अचानक त्यानी आम्हाला सांगितले की आज मी तुमची काल शिकविलेल्या भागावर चाचणी परीक्षा घेणार आहे. मी तुम्हाला ३ प्रश्न देईन प्रत्येकी ५ गुणांसाठी ते तुम्ही न बघता वहीच्या एका पानावर लिहून माझ्याकडे जमा करायचे. उजळणीसाठी म्हणजेच वाचण्यासाठी त्यांनी आम्हाला १० मिनिटे दिली. व नंतर त्यांनी आमची चाचणी घेतली व वहीचे पान त्यांनी जमा करून घेतले

दुसऱ्या दिवशी त्यांनी ते तपासलेले पेपर आणले व यादृच्छिक पद्धतीने त्याचे वाटप केले. त्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे पेपर मिळाले परंतु माझा पेपर मला नाही मिळाला. मी त्या विचारात असताना मॅडमने विचारले की कोणाला पेपर मिळाला नाही आहे ? असे त्यांनी विचारल्यावर मी उभी राहिले. त्यांनी मला नाव विचारले मी नाव सांगितल्यावर त्यांनी त्या पेपरवरील नाव बघितले व वर्गासमोर बोलाविले व त्यांनी माझा पेपर माझ्या हातात दिला व माझे कौतुक केले. पूर्ण वर्गात पैकीच्या पैकी गुण मिळवणारी मी एकच विद्यार्थीनी होते. त्यांनी माझा पेपर वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला दाखविला व कशी उत्तरे लिहीली आहेत हे पाहण्यास सांगितले. त्यावेळेस माझ्यामध्ये खूप आत्मविश्वास निर्माण झाला.

मी ही काही तरी करू शकते हा विश्वास त्यांनी माझ्यामध्ये निर्माण केला. आजपर्यंत आपल्याला सर्वांनी कमी लेखले होते, आपण काहीही करू शकतो आपल्यामध्ये कमतरता नाही आहे याची मला जाणीव झाली. मी ही उत्कृष्ट आहे हुशार आहे याची मला त्यांनी जाणीव करून दिली. प्रयत्न केल्याने सर्व काही होते हे मला कळले. त्यांनी मला स्वतःची जाणिव करुन दिली की आपण कोणापेक्षाही कमी नाही आहोत. तेव्हापासून मी मन लावून अभ्यास करण्यास सुरुवात केली. व तेव्हापासून मी कधीच मागे पडली नाही. अगोदर मला परीक्षेत कमी गुण मिळायचे. माझ्या घरच्यांना मी चांगली शिकेल याचा ही विश्वास नव्हता. पण त्या एका घटनेने माझ्या आत्मविश्वास बळकटी दिली. मला प्रयत्न करण्यास शिकविले.

त्यानंतर मी स्वतःला प्रत्येक वेळेस पुढे जाण्यासाठी तयार केले. तेव्हापासून एका ढ विद्यार्थिनीपासून चांगल्या विद्यार्थीनी पर्यंतचा प्रवास मी केला. मी माझे स्वतःचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली. आपले काय चुकत आहे. आपण कोणत्या गोष्टीमुळे मागे पडत आहोत ? कशामुळे आपल्याला कमी गुण मिळत आहेत याचे निरीक्षण करण्यास मी सुरुवात केली. मी माझ्या चुका काढण्यास शिकले. व त्यानंतर मी खूप छान प्रगती करत गेले. प्रत्येक वर्षी मी वर्गात दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाने वर्गात उत्तीर्ण होऊ लागले.

१०वी ला असतानाही बोर्डाच्या परीक्षेमध्ये माझा हिंदी या विषयामध्ये दुसरा क्रमांक आला. मी बक्षीस घ्यायला गेली तेव्हा मला ते बक्षीस त्यांच्या हातून देण्यात आले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर खूप छान स्मित हास्य होते. अशा पद्धतीने मी माझी प्रगती करत गेले. त्यांच्यामुळे माझ्यामध्ये बदल झाला म्हणून मी त्यांना एक आदर्श म्हणून पाहते. त्यांनी मला मी काय काय करू शकते याची जाणीव त्यांनी मला करून दिली.त्यांनी मला फक्त शैक्षणिकदृष्ट्याच नाही तर मानसिकदृष्ट्या

ही मदत केली. एकदा मला परीक्षेमध्ये कमी गुण मिळाले होते व मी माझ्या वैयक्तिक कारणामुळे मी मानसिकरित्या ही थोडीशी तणावात होते. त्यावेळेस ही त्यांनी मला वैयक्तिकरित्या जवळ बोलावून काय त्रास आहे ते विचारले व त्यावरील उपाय ही त्यांनी मला सांगितले. त्यांनी मला मार्गदर्शन केले. अशा प्रकारे एखादया मैत्रिणीप्रमाणे त्यांनी माझे दुःख समजून घेतले व मला सहकार्य केले. ही गोष्ट मी कधीच विसरू शकणार नाही.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्याप्रमाणे शिक्षकाला 'गुरुर – ब्रम्हा', 'गुरुर – विष्णू', 'गुरूर – देवो – महेश्वरा' असे संबोधले जाते. ते अगदी बरोबर आहे. गुरू म्हणजे शिक्षकच आपल्याला घडवीत असतात. आपण त्यांच्याकडूनच अनेक गोष्टी शिकत असतो. मला लाभलेल्या शिक्षकांपैकी या शिक्षिकेला मी माझा आदर्श मानते. व असे शिक्षक सर्वांना मिळावे हीच अपेक्षा बाळगते. त्यांच्यामुळे माझ्यामध्ये खूप बदल झाला. मी स्वतःला ओळखायला लागली. त्यांनी माझ्यामध्ये स्वतःला सिद्ध करण्याची भावना निर्माण केली. असे शिक्षक सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आदर्श असायला हवेत. त्या माझ्यासाठी एक आदर्श तर आहेतच त्याच बरोबर एक चांगली मैत्रीण, प्रेरणा स्थान व आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत. त्या आजही शाळेत शिकवित आहेत कार्यरत आहेत. व अनेक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवत आहेत.



पायल बाबासाहेब ननवरे.

हजेरी क्रमांक –२५

**"शिक्षक हा ज्ञानाचा दीप असतो , जो अज्ञानाच्या अंधारात उजेड देतो."**

# " माझे आदर्श शिक्षक "

श्री. प्रो. सागर ससाणे
के. एम. सी कॉलेज, खोपोली



शिक्षक हा आपल्यासाठी देवाचा विशेष आशीर्वाद आहे. शिक्षक असे व्यक्ती आहेत जे एक चांगले राष्ट्र निर्माण, करतात आणि जगाला एक चांगले स्थान बनवतात. ते लोकांचे जीवनमान उंचावत असल्याने त्यांना समाजात खूप आदर अहे. एक आदर्श शिक्षक हा मित्रासारखा असतो जो आपल्या सर्व संकटात मदत करतो. एक आदर्श शिक्षक त्यांची वैयक्तिक शिक्षण प्रक्रिया तयार करतो जी अद्वितीय असते आणि मुख्य प्रवाहात नसते. त्यामुळे विद्यार्थी हा विषय चांगल्या पध्दतीने शिकतात. माझे पदवीचे कॉलेज के. एम. सी. कॉलेज, खोपोली होते. आणि माझे मोठे नशीब म्हणजे आम्हाला मिळालेले ससाणे सर हे मला तृतीय वर्ष कला शाखामध्ये भूगोल विषय शिकवायचे, प्रा. सागर ससाणे सरांच्या मध्ये मला एक आदर्श शिक्षक मिळाले.

वर्गात असताना, ते खूप कठोर आणि शिस्तप्रिय, होते, त्याचप्रमाणे प्रेमळ आणि सतत उत्साही असायचे. ससाणे सर मनापासून प्रत्येक विदयाथ्याथ्यांचे समाधान होईपर्यंत ते आम्हांला समजावून सांगायचे. त्यांची शिकवण्याची पध्दत खूप चांगली असायची. त्यांचे प्रत्येक प्रकरणाचे विदयार्थ्यांना सोपे होईल असे स्पष्टीकरण आणि सुरेख विचार यामुळे आम्ही त्यांचे शिकवणे लक्षपूर्वक ऐकायचो. ते एक मेहनती शिक्षक आहेत. माझ्या आयुष्यातच माझा आदर्श शिक्षक म्हणून मी ससाणे सरांना नेमले. कारण शिक्षक हा विद्याथ्याचा शिल्पकार असतो.

मला माझ्या पदवी नंतरच्या शिक्षणाचे मार्गदर्शन सागर सरांनी केले. मला कोणत्याही विषयाची शंका असली तरी आतासुद्धा ते मदत करतात. खुरच माझ्या आयुष्यातले अविस्मरणीय शिक्षक सागर ससाणे सर आहेत. अभ्यासाबरोबर मला आयुष्याची किंमत काय आहे हे सुद्धा सांगितले. कारण सर्व शिक्षक फक्त विद्या विद्यार्थ्याला देण्याचे काम करतात परंतु मला सरांनी आयुष्यात तुझी किंमत तू कोणत्या विकाणी जीवनाला ठेवते यावरून कळत असते. त्यामधले काही अनुभव मी या निबंधा-द्वारे सांगू इच्छिते, एका दिवशी आम्हा सर्व विद्यार्थ्यांना एका विषयासंबंधी शंका होती आणि परिक्षा सुद्धा दोन दीवसावर असल्यामुळे सरांनी आम्हाला रविवार असून प्राचार्य यांची परवानगी घेऊन त्या विषयासंबंधीची अडचण सोडवली. त्यावेळेस मला त्यांचा अत्यंत अभिमान वाटला की त्यांच महत्त्वाच काम सोडून त्यांनी आमच्यासाठी रविवार सुट्टीचा दिवस असून ते आले आणि आमची शंका दूर केली.

आमच्या सहलीचे नियोजन, सर्व जबाबदारी सरांनी केली होती. कदाचित आम्ही सर्वजण त्याच्यांमुळेच सहलीला गेलो होतो खास करून मी कारण माझ्या काही खाजगी अडचणीमुळे मी जाणार नव्हती, पण सरांना आम्ही सर्व विद्यार्थी खुप प्रिय होती त्यांना वाटायचे की सर्वांनी आले पाहीजे आणि एखाद्या आजारावरचे औषध असावे तसे आमचे सागर ससाने सर होत. आमच्या सर्वांच्या अडचणी वरचा उपाय, आमची सहल पुणे येथे गेली होती. त्यामध्ये शनिवार वाडा, लाल महाल, भीडे वाडा, दगडूशेठ हलवाई मंदीर, नारायणी धाम,सिंहगड, खडकवासला धरण, प्रतिशिर्डी, राजीव गांधी प्राणीसंग्रहालय व वन्यप्राणी संशोधन केंद्र, व्याज, वारणा दुध डेअरी अशा विविध विकाणी आमची सहल सरांनी उत्तम प्रकारे नियोजीत केली होती. त्यांना खुप वाटायच की माझ्या विद्यार्थ्यांनी सर्व जग पहात त्यासाठी ते आम्हाला सोयीचे होईल अशा विकाणी घेऊन जायचे.खऱ्या अर्थाने मी भूगोल हा तृतीय वर्ष कला आणि ससाण सरांकडून शिकले. कारण सर नेहमी बोलायचे, की भूगोल अनुभवाय चा असेल तर पयर्यावरण फिरावा लागेल आणि त्यांनी एका वर्षासाठी का होईना मला आणि सर्व भूगोल विभागाला पर्यावरण नदी पर्वत, नकाशे, दरी, पठारे, माती, दगड यांसर्व गोष्टींची गोडी लावून दिली. आजसुद्धा आम्हांला त्यांची खूप आठवण येते की एक प्राध्यापक ते नव्हे तर मित्र या नात्याने आमच्या सुख दुःखात ते सामिल झाले.

सरांना वाटायचे की कॉलेज संपल्यानंतर आम्ही विसरून जाऊ पण ते आमच्या / माझ्या आयुष्यातील अमुल्याचा ठेवा आहेत. मी जेव्हा भूगोल विषय घ्यायचा नाकारल त्यावेळी सरांनी त्याविषय म्हणून नाही तर तुला काहीतरी करायचय, तुझ्या आयुष्यांची किंमत तुला मिळवायचे त्यावेळी माला गोष्ट सांगितली आपण जसे चांगल्या मार्गाने घडत जातो त्यावेळी आपल्या जीवनाची किंमत आपण ठरवत असतो. मला त्यांचे बोलणे पटले व मी भूगोल विषय घ्यायचा निर्णय घेतला आणि आजू मला आनंद आहि, की मी आयुष्यात एक आदर्श शिक्षक मिळवला आहे. तृतीय वर्षाला सर आम्हाला महाराष्ट्र भूगोल, पर्यावरण भूगोल, पर्यटन भूगोल वस्ती भूगोल, भौगोलीक तंत्रज्ञान हे दीन सत्रंमध्ये शिकवले. कधी सर कॉलेजला अले नसले तरीपण आमाला फोन करुन आमदी अडचण सोडवायचे. त्याचप्रमाणे परीक्षेला जाताना संपूर्ण तयारी केली ना? पेपर चांगला लिए, असे सांगायचे जणू काय आपले शिक्षक नसून आमचे शिक्षक पालक सर्व विद्यार्थ्यांना असे वाटायचे, त्यांनी माझ्या आयुष्यात उत्तम अशा भूमिका पार पाडल्या आहेत. व परिस्थती पाहून त्यांचे उपक्रम सांगितले होते. सरांनी कधीच कोणाचा राग, भेदभाव केला नाही सर्वांना त्यांचा प्रेमळ स्वभाव प्रतेक मुलांच्या मनात भरला होता. कधी कधी सर आमच्या हट्टासाठी किंवा आग्रहामुळे एकत्र भोजन सुद्धा करायचे, शिवाय कला शाखामधील सर्व विद्यार्थ्यांना सरांचा स्वभाव खूप आवडायचा त्यामुळे विदयार्थी १ रुपयाचे चॉकलेट देऊन खायचा.

सरांची एका वर्षाची सवय मला आयुष्यभराची आठवणीत राहील. आता कॉलेजचे दिवस संपले, परीक्षा सुद्धा झाली वेळ आली निरोप समारंभाची आम्ही सर्व कॉलेज सोडणार यापेक्षा सरांची काळजी, सवय, प्रेमळपणा सर्व गोष्टीमुळे डोळे पाण्याने भरले. सरांनी आम्हाला कधीच त्यांच्या पाया पडू नाही दिले म्हणायचे मी मोठा नाही की कोणी माझा पाया पडेल. निरोप घेण्याच्या वेळी आम्हा सर्वांना एकच गोष्ट सांगितली की, जे काही कराल ते विचार करून करा कारण सोडून जाणारे खूप आणि असणारे कमी असतात. पुढील शिक्षण सर्वजण घेतील वेगवेगळ्या ठिकाणी जातील परंतु हे दक्षात ठेवा कोणी काहीपण सांगेला तुम्हाला जे करायच ते स्वतः करा. कारण कष्ट करतो त्याला त्याचे फळ मिळते. असे सुंदर विचार आम्हाला सरांनी दिले. सरांच आयुष्य हे नेहमी घाई गडबडीत असायचं कारण सरांनी खूप माणसे कमवली, आणि मला सुद्धा सरांसारख आदर्श शिक्षिक व्हायच. मी सरांच्या हा प्रामाणिकपणा, कठोरपणा सर्व

गोष्टी वाढूनच उत्तम शिक्षिका बनण्याचा निर्णय घेतला, या निबंधातून मी सरांसाठी कविता तयार केली आहे आणि आज मी यथ पर्यंत पोहोचले ते सरांमुळेच त्यांनी मला मार्गदर्शनासोबत एक आधार दिला की मी काहीच करु शकत नव्हते, पण त्यांनी मला सांगितले की तु कर कारण तुम्ही सर्व विद्यार्थी देशाचं भविष्य आहात. आणि आजही मी त्यांना भेटायला गेली तरी माझ्या सर्व आठवणी जाग्या होतात आणि सरांनी शिकवलेले प्रत्येक क्षण आठवतो.

नेहमी ज्ञानाची तहान असते तो शिक्षक ,

नेहमी विद्यार्थ्यांची प्रगती पाहतो तो शिक्षक,

नेहमी ज्ञानाच्या अंजनाने प्रगल्भ करतो तो शिक्षक,

नेहमीच घडतो अन् घडावतो तो शिक्षक.......

मी निबंधातुन येवढं सांगेल की, आयुष्यामध्ये एक आदर्श शिक्षक असावा, तो सुद्धा सागर ससाणे सरांसारखा असावा कारण शिक्षक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला अंधार बाजूला करून प्रकाशाकडे नेहण्याच काम करत असतो, आणि ते माझ्या आयुष्यामध्ये सागर सरांनी केलेल आहे मी त्यांचे खूप ऋणी आहे आणि स्वत स्वतःला नारीबवान समजते की आज सुद्धा सरांचा मनात विदयार्थी म्हणून. मी पण चांगली प्राध्यापिका होण्यासाठी प्रयत्न करेल.



नाव :- सिध्दी विलास मुसळे

हजेरी क:- २३

एक चांगला शिक्षक आशा जागृत करून कल्पनेला प्रज्वलित करू शकतो.

शिक्षण हे एक प्रभावी अस्त्र आहे, जे वापरून तुम्ही प्रत्यक्ष जग बदलताना बघू शकता. तर विद्यार्थ्यालाच त्यातुन प्रवेश करायचा असतो. स्पर्श न करता विद्यार्थ्याला शिक्षा करता येते, तोच खरा शिक्षक !"

## " माझे आदर्श शिक्षक "



j

प्राध्यापक डॉ जयेश सुधाकर अणेराव.

महाविद्यालय - कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय,लांजा

तालुका - लांजा जि रत्नागिरी

आपल्याला देवाचा कोणता योग्य आशीर्वाद जर मिळावा असेल तर तो शिक्षक होय. शिक्षक हा एक आत्मियतेचा एक घटक मानला जातो. एक विदयार्थी, एक राज्य, एक राष्ट्र यांचा समतोल कसा राखायचा आणि त्याची निर्मिती करून आपल्या आधारस्तंभाला जगासमोर कसे चांगले स्थान प्रस्थापित करता येईल. याचा जर कोणी खऱ्या अथनि प्रयत्न करत असेल तर तो एक शिक्षकच असतो. त्यांना आपण जीवनाचा अविभाज्य घटक सुद्धा म्हणू शकतो. ज्या प्रमाणे एखादा कारागीर आपल्या कालाकारीने एखादया वस्तुला आकार देवून त्याला पूर्णत्वास नेतो. त्याच प्रमाणे एखादया विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वला सुरेख भाकार देण्याचे महान कार्य शिक्षक करतात.आणि मला घडवण्याचे काम माझ्या महाविदयालयाने केले आणि अशाच शालेय, विदयालय, आणि महाविदयालयीन जीवनात मला खूप शिक्षक लाभले,पण माझ्या आयुष्याला खऱ्या अर्थाने कळाटनी देणार शिक्षक म्हणजे प्राध्यापक डॉ. जयेश सुधाकर अणेराव सर.

गुरुब्रम्हा गुरुर्वविश्री गुरुर्देवो महेश्वरा , गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः.

## परिचय-

जयेश सरांचा परिचय द्यायचा झाला तर, तसे ते आमच्याच गावचे रहिवासी परंतु दोन गावांच्या मध्ये नदी असल्यामुळे ते आंगवली गावात मोडायचे. साथी राहणी, गोर वर्ण, शांत स्वभाव, हसमुख चेहरा त्यांना बघूनच

Edit with WPS Office

वाटायचं की ते एक उच्च शिक्षित व्यतिमत्व असणार.साथी राहणी, गमतीदार, खेळकर शांत स्वभाव. जयेश सरांची शैक्षणिक पात्रता सांगयची झाली तर ती अशी-

M.SC, CSIR-NET, MH-SET, ICAR-NET, Ph.D. Post. Doc.

ज्याची मी कल्पना हि करु शकत नाही, इतके प्रभावशाली आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्व ज्याला कशाचीही ही तोड नाही. त्यांना लांजा कॉलममधील NAAC ची जबाबदारी सुद्धा देण्यात आली होती. त्यांना भारत सरकारची सुध्दा परितोषिके मिळाली आहेत उदा.

1) SERB-DST Young scientist fellow 2014-17. Department of science and technology Government of India.

2 )INSA Visiting scientist Award 2021-22, Indian National C science Academy, New Delhi, Government of India etc.

## एकमेकांची प्रत्यक्ष ओळख -

मी जेव्हा माझी पदवी पूर्ण करून A.S.P महाविद्यालय देवरुख मधुन बाहेर पडलो आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी A. C.S.लांजा महाविद्यालयात दाखल झालो, तेव्हा मला कल्पनाच नव्हती की अशी कोणी व्यक्ती माझ्या आयुष्यात येवून माझ आयुष्यच बदलून टाकेल. मी महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि दिवसामागुन दिवस जात होतो. पण पहिल्या सत्रामध्ये मी त्यांना कधी पाहिलच नव्हत आणि दूसर सत्र सुरु होताच माझा आणि त्यांच्या प्रत्यक्ष संबंध जळून आला.खर तर त्यांचा विषय हा microbiology, cell,2D, म्हणजेच पूर्ण मोलुक्युल बदल त्यांना अगणित असे ज्ञान होते.त्या संदर्भात कोणत्याही प्रश्नांची सविस्तर माणि लॉजिकल उत्तरे ते देत असत. अशातच पहिल्याच तासाला त्यांनी  सर्वांची विचारपूस केली. माझा नंबर येताच मी सांगितल मी देवरुख मधुन आलोय तर त्यांचा प्रश्न गाव कोणत ? मी बोललो कासारकोलवण मग अशातच त्यांनी स्मितहास्य करत माझ्याकडे पाहिल आणि बोलले अरे रे! आपण एकाच गावचेकीरे अगोदर मला काही समजतच नव्हती की एवढ प्रभावशाली व्यक्तिमत्व आपल्याच गावात आहे. आणि त्याची मला जराही कल्पना नाही. मग जसजशी ओळख होत गेली, तसतसे आमच्यातले शैक्षणिक संबंध अजून दृढ होत गेले आणि मी काहीतरी कराव असं त्यांना नेहमीच वाटत होत. त्यासाठी माझ्याकडून काही चुक झाल्यास मला रागवायचे कधी कधी तर मला टोचून बोलायचे की तुला काही जमणार नाही तु कशाला शिकतोय सोडून दे सर्व आणि काहीतरी कामधंदा कर.अस बोलणं ऐकल्यावर मलाच वाईट वाटायच आणि याच्यातील न्युनगंड कधी जाणार याची त्यांना सारखी काळजी असायची. माझं काहीतरी व्हावं यासाठी नेहमीच ते झटतं असतं.

## मी एक जबाबदारी-

पदवीनंतर, पदव्युत्तर शिक्षण घेत असताना त्यांच्या जवळ-जवळ दोन वर्षे मी सानिध्यात होतो. ते एखादा विषय शिकवत असताना अचानक पणे जर त्या विषयात काही प्रश्न केला तर बाकिची मुलं बोलायची आणि माझी मात्र काय बोलू ही पंचायत व्हायची. आणि काय रे संकेत ऐवढी साथी गोष्ट किंवा एवढ्या साध्या प्रश्नाचे उत्तर तुला देता येत नाही, नक्की पदवी घेतलेय की, पैसे देवून विकत घेतली आहे. असे त्यांचे कठोर बोल असायचे.मात्र या बोलीमध्ये माझ्याबद्दलची एक जबाबदारी, एक आत्मियता त्यांच्या डोळ्यात नेहमी दिसायची. कधी-कधी रिकाम्या वेळेस जवळ बसवून समजावून, हे करायच, हे करू नये. कोणत्या क्षेत्रात किती संधी आहेत. त्यांचे मापन आहे की नाही असल्यास ते काय आहे ? कोणते आहे ? त्याला पर्याय काय ? अश्या अनेक प्रश्नांची मांडणी ते माझ्या समोर करत. मला ते नेहमी सांगायचे ज्या विषयात तु ज्ञान घेतोस त्यांचे सखोल ज्ञान घेणं किती गरजेचे आहे आणि ते घेतलेच पाहिजे. वरवर शिक्षणाचा काही उपयोग नसतो. माझ्याबददल प्रेमाचा भाव अगदी निशुल्क होता. त्यांच्या

Edit with WPS Office

गावातील असल्यामुळे ते एका पालकाप्रमाणे माझ्याकडे लक्ष देत आहेत का ? असा कधी कधी मला प्रश्न पडे ?जस की माझं आयुष्य घडवण्याची एक जबाबदारी त्यांच्यांकडेच सोपवण्यात आली आहे की काय? असं कधी कधी वाटायचं. त्यांच्यातील गुणवैशिष्टये सांगायची झाली तर, अडल्या-नडलेल्याला मदत करणे, कोणत्याही कामात-कार्यात सहभाग घेणे. आयुष्याच्या वळणावर जयेश सरांची कधी नकळत आठवण येऊन मला सोमनाथ खेटकर सरांची कविता मला सार्थ आठवते.

शिक्षक म्हणजे

आयुष्याला कलाटणी देणारी प्रेरणा

ध्येयापूर्वीसाठी मार्ग दाखविणारी दिशा

कधी बिकट परिस्थितीत, प्रेमाची सोय,

तर कधी पाठीवरील शाबासकीचा हात,

कधी कौतुकाचे गोड शब्द

तर कधी मनाला टोचणारे टोमणे

चांगले संस्कार करणारी मुर्ती

संकटकाळात धैर्य देणारी स्फूर्ती

चारित्र्यपूर्ण विदयार्थी घडवणारा शिल्पकार

जादूची छडी जी करते विद्यार्थ्यांची स्वप्ने साकार....

हे बेटकर कवींचे शब्द वाचले आणि अचानक मला सरांची आठवण येते. माझ्या द्वितीय सत्राची एक आठवण आहे.आमची द्वितीय सत्राच्या परिक्षेचे फार्म निघाले होते आणि बाकी सर्वांनी फॉर्म भरले परंतु मला वगळता, माझी काही फॉर्म भरण्याची पात्रता नव्हती असं काही नाही परतु त्या क्षणी माझ्याकडे पैसे नव्हते. तर त्यांनी परिक्षा विभागात बोलून माझ्या फी चा विषय तातपुरता लांबवला होता पण, त्याची काही जाण मी ठेवली नव्हती. परिक्षा तोंडावर आल्यावर मी सर्वांकडे नोट्सची विनवणी करत होतो. पण काही जुळणी झाली नाही, नाइलाजाने मला चिट करावी लागली.पहिल्याच पेपर मध्ये सावळगी मॅडमने मला पकडल पण, कोणालाही न सांगता त्यांनी सरळ ही गोष्ट जयेश सरांकडे मांडली. तेव्हा सर बोलले तो मुलगा अस करण शक्यच नाही, असं सर माझ्याबद्दल बोलले जे जेव्हा मला समजलं तेव्हा मला काही सुचेनास झालं माझ्याबदद्दल असणारा प्रामाणिकपणाचा आंधळा विश्वास त्यांच्या बोलण्यातून मला जाणवला.माझ्या नजरेत मीच पूर्ण उतरून गेलो होतो. त्याच्या दुसऱ्याच्या पेपरच्या थोडा वेळ अगोदर मी जाऊन सरांना सारी हकिकत सांगितली.त्याच क्षणी सरांच्या डोळ्यातील त्या भावना सर्व काही माझ्या मनाला सांगून गेल्या आणि माझी मत्ताच लाज वाटली. सरांना त्वरित माझ्या नावावर पंधरा दिवसांच रस्टीगेशन नोटीस माझ्या समोर हेट क्लार्क डाफळे सर यांना काढायला सांगितली खरी पण, का कुणास ठाऊक काही अगदी काही वेळेनंतर ती रदद करण्यास सांगितली जेणे करून माझं शैक्षणिक नुकसान होवू नये. इतकी त्यांना माझ्याबद्दलची किव म्हणू की आत्मीयता म्हणू तेच मला समजत नव्हतं.

Edit with WPS Office

## सुधारणा

त्या घटनेनंतर माझ्यामध्ये अमूलाग्र बदल झाला. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच मी विविध स्पर्धामध्ये भाग घेत होतो. उदा. कविता लेखन, ललित लेखन, निबंध लेखन जरी ते विज्ञानाचे प्राध्यापक असले तरी या गोष्टींचे ज्ञान पुर्णपणे होते.जयेश अणेशव सरांची एक गोष्ट मला अजुनही आठवते ते आजही बोलतात तुम्ही कोणत्याही विषयात का असेना तुमच्या विषयाचे सखोल ज्ञान तुम्हाला अवगत असणे गरजेचे आहे.पण इतर विषयांची सुद्धा माहिती असायला हवी. मग त्यांच्याच मार्गदर्शनाखाली मी physio-chemical parameterr's of various water bodies in Ratnagiri district. या विषयावर माझा रिसर्च चालू केला. तर त्यावर त्यांच अस मत होत की तु तुझं काम स्वतःच करायच कर मी फक्त केलेल काम बरोबर आहे की नाही याचा मागोवा घेईन बस. त्यांनी मला वेळेची किंमत समजावून दिली, स्वतःची कामे स्वतःच करायची सवय लावली. माझ्याबददल एक आत्मियतेची भावना होतीच परंतु त्यांनी इतर मुलांना कधी वेगळ मानलं नाही. मी थोडा अभ्यासात कमी होतो म्हणून,परंतु ऐकाला कमी ज्ञान व एकाला जास्त ज्ञान असा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही आणि आता ही ते करत नाहीत. त्याच म्हणणं असायच सर्वांनी एकत्र पुढे जायच कोणालाही मागे न टाकता मग तो कसा का असेना. एखादया खोडकर मुलावर ना कधी रागवण,हा कधी-कधी टोपणे असायचे पण ते तेवढ्या पुरतेच.त्यांच्या मधील व्यक्तिमत्व येवढ प्रभावी, परिणामकारक, ज्ञान समुद्ध होते की ते विद्यार्थांसाठी खूप उपयुक्त असायच. आजची आव्हाने आाणि भविष्यातील आम्हाला कोणत्या समस्यांना सामोरे जायचे आहे यासाठी आम्ही कसे समक्ष बनायला हवेत ते फावल्या वेळेत आम्हाला एकत्र बसवून सांगत असत.स्वतः मधील उणीव कश्या दुर कराव्या हेही ते सांगत. ते असं सर्व सांगायला लागले की त्यांची वाणी एकतचं राहाव असं वाटायचं. आज मी ज्या काही स्तरावर शिक्षण घेतोय तर ते त्यांच्या पाठिंब्यामुळे. कोणीतरी म्हटलेच आहे कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला भाकार देऊन त्याच सुंदर भांड बनवतो,त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला सुरेख आकार देण्याचे महान कार्य शिक्षक करतात तसेच माझ्या जीवनाला आकार देण्याचे काम अणेराव सरांनी केल. त्यांनी मला पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर माझ्या आयुष्याला आकार देण्याचे मोलाचे कार्य केले.अश्या अणेशव सरांची तथा अष्टपैलू शिक्षकांची आज आपल्याला आणि आपल्याला समाजाला नितांत गरज आहे.त्यांच्या सारखा प्रेमळ. कर्तव्यदक्ष अष्टपैलू सरांना मी कधीच विसरणार नाही.




**संकेत संतोष तोरस्कर**

**हजेरी क्रमांक - 34**

Edit with WPS Office

# "माझे आदर्श शिक्षक"



**डॉ.श्री. संजय वाघ**

**प्राचार्य**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पालघर**

शिक्षक - शब्दाने ज्ञान वाढिवणारे
जगण्यातून जीवन घडिवणारे
मूल्यातून तत्वे शिकिवणारे
समाजाला योग्य दिशा दाखविणारे.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरा**

**गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः**

प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये शिक्षकाला अमूल्य स्थान असते. आई -वडील हे आपले पहिले गुरू असतात तर शिक्षक हे आपले दुसरे गुरू असतात. शिक्षक आपल्याला ज्ञानर्जनासोबतच चांगले संस्कार देण्याचे महान कार्य करत असतात. आम्हा विद्यार्थ्यांच्या चिमुकल्या पंखात आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य निर्माण करतात.

माझे नाव श्रीमती सविता सुभाष वाघे अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे मी प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेत आहे. आज आमचे प्राध्यापक डॉ. बी. जी. खाडे सर यांनी वाङमय मंडळातर्फे निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे आणि विषय दिला 'माझे आदर्श शिक्षक' या स्पर्धेतील स्पर्धेचे स्वरूप समजावून सांगितले आणि त्याचक्षणी आयुष्यातील संपूर्ण शैक्षणिक घडामोडी एका क्षणात नजरेसमोर आल्या. आत्तापर्यंतचे शिक्षक डोळ्यासमोर उभे राहिले, सर्वप्रथम मी माझ्या आयुष्यात लाभलेल्या सर्व शिक्षकांना शतशः नमन करते.

" गुलाबाप्रमाणे हसरे माझे शिक्षक
आकाशाप्रमाणे विशाल माझे शिक्षक
निराधाराला आधार माझे शिक्षक
अशिक्षिताला शिक्षित करणारे माझे शिक्षक

समाजाला आदर्श माझे शिक्षक"

याचप्रमाणे माझ्या प्राथमिक शिक्षणाचा पाया रचणारे व मजबूत करणारे रायगड जिल्हा परिषदेची शाळा गोरेगाव येथील शिक्षक आहेत. माझे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण या शाळेत पूर्ण झाले. मराठी शाळेतील मा. बापट बाई, तपकिरे बाई, साठे बाई, मेथाबाई व डांगे बाई या सर्वांची व्यक्तिरेखा व देहबोली आजही जशीच्या तशी माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. त्याचप्रमाणे शिकवणीच्या जागेवर शिकवण आणि शिस्तीच्या जागेवर शिस्त आजही आठवल्याशिवाय राहत नाही बहुतेक त्या शिक्षणामुळे, प्रेमामुळे आणि शिस्तीमुळे जे संस्कार घडले त्याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. प्राथमिक शिक्षण घेत असताना सर्व शिक्षकाने आमची पालकांप्रमाणे काळजी घेतली.

इयत्ता चौथीतील एक घटना माझ्या कायम स्मरणात राहिली, ती म्हणजे आमची सहल महाबळेश्वर येथे जाणार होती परंतु मी एका पायांने अपंग असल्याने माझे आई-वडील सहलीला पाठवण्यास तयार नव्हते, पण माझी इच्छा खूप होती. त्यानंतर माझ्या शिक्षकांनी आई-वडिलांना समजावले व त्यांनी मला सहलीला जाण्यास परवानगी दिली माझ्या शाळेतील माझ्या आवडत्या शिक्षिका म्हणजे आमच्या साठे बाई खूप कडक शिस्तीच्या होत्या पण प्रेमळ ही होत्या. असं म्हणतात की, 'फणस काटेरी दिसला तरी त्याचा गाभा अत्यंत मधुर रसाळ असतो'. त्याचप्रमाणे आमच्या साठे बाई होत्या. सहलीला गेल्यानंतर त्यांनी माझी आई प्रमाणे काळजी घेतली म्हणजेच थोड्यावेळाने मी चालून चालून खूप थकले माझे पाय खूप दुखू लागले तर अक्षरशः त्यांनी मला आईप्रमाणे कडेवर घेऊन सहल फिरण्यास मदत केली साठे बाई आज जरी आपल्यात नसल्या तरी त्यांची मोलाची मदत ही आयुष्यभर विसरू शकत नाही.

एक पुस्तक

एक पेन

एक विद्यार्थी

आणि एक शिक्षक

हे संपूर्ण जग बदलवू शकतात.

आदर्श शिक्षक..... आदर्श शिक्षक म्हणजे काय याची कल्पना त्या बालवयात नव्हती, परंतु आज मागे वळून पाहताना आदर्श शिक्षक कसा असतो याची कल्पना मात्र नक्कीच येते. इयत्ता चौथी पर्यंतचे शिक्षण मराठी शाळेत झाल्यानंतर गोरेगाव येथील ना. म. जोशी विद्याभवन आणि राजाभाऊ मोने उच्च माध्यमिक विद्यालय गोरेगाव -रायगड येथे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. तिथे सुद्धा मला अनेक शिस्तप्रिय आणि गुणवंत शिक्षक लाभले.

बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी डी. टी. एड्ला प्रवेश घेण्याचे ठरवले, माझा नंबर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेल येथे लागला तिथे प्रवेश घेतला. आता घरापासून दूर परगावी शिक्षणासाठी एकटे राहायचे कसे? माझ्यासारखी इतरही मुलींची अशीच व्यथा होती, परंतु माझी मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह पनवेल येथे राहण्याची व्यवस्था झाली. त्यामुळे माझ्या एका नवीन आयुष्याला सुरुवात झाली. पनवेल मध्ये विद्यालयात आम्हाला आमचे आदरणीय डॉक्टर संजय वाघसर हे गुरु म्हणून लाभले हे आमचे भाग्य समजते. सरांची पहिल्यांदा प्रवेश फेरीच्या वेळी तोंड ओळख झाली तेव्हा असे वाटलं होतं की हे खूप कडक शिस्तीचे रागीट स्वभावाचे आहेत, परंतु असं म्हणतात की, माणसाची खरी पारख करायची असेल तर चेहऱ्यावरून नाही तर त्याच्या सहवासात, संपर्कात राहा व त्याला ओळखा त्यानंतरच त्याच्याबद्दल आपले मत व्यक्त करा. जसजसे आम्ही महाविद्यालयात सरांच्या सानिध्यात शिक्षण घ्यायला सुरुवात केली तस तसे आम्हाला सरांची अष्टपैलू व्यक्तिमत्व समजत गेले. वाघसर हे संस्थेमध्ये एक ज्येष्ठ अधिव्याख्याता होते आता सध्या ते जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पालघर येथे प्राचार्य या पदावर कार्यरत आहेत परंतु शिस्तप्रिय असे कडक शिस्तीचे वाघ सर आमच्यासाठी एक आदर्श व्यक्तिमत्व आहेत.

आकाशात भरारी घेताना

पक्षाला पंख असावे लागतात


मनमोहक वातावरणासाठी

फुलाला सुगंध असावा लागतो
विद्यार्थ्याला शिक्षण घेताना
चांगला शिक्षक असावा लागतो.

अशाच प्रकारचे एक चांगले शिक्षक वाघ सर आम्हाला मिळाल्यामुळे जीवनातील प्रत्येक अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मला मिळाली. वाघ सरांना कोणतेही सांगितलेले काम वेळेत पूर्ण झालेले आवडायचे जर त्यांनी दिलेले काम वेळेत पूर्ण नसेल तर ते काम दहा वेळा करायला लावायचे त्यामुळे आम्हाला वक्तशीरपणाची सवय लागली. कोणत्याही कामात हयगय केलेली त्यांना आवडत नसे. प्रत्येक कामात टापटीपपणा असावा असे ते म्हणतात. कोणतेही काम अशक्य नाही, आपण प्रयत्न करत रहायला शिकले पाहिजे.

आम्ही घरापासून लांब होतो, परंतु आम्हा वस्तीगृहातील मुलींवर वडिलांप्रमाणे सरांचे लक्ष असायचे आम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या आली तरी सर त्यावर उपाययोजना सुचवायचे. सरांचे मराठी भाषेवरील प्रभुत्व खूप चांगले आहे त्यामुळे आम्हाला लेखनातील चुका सुधारण्यास मदत मिळायची. सरांकडून आम्हाला प्रेरणा, मार्गदर्शन, आधार हे वेळोवेळी मिळतच होते. पण त्यातून वेगळं नाविन्यपूर्ण आम्हाला आवडले ते म्हणजे 'एक माणूस कसा असावा', त्यांनी कसे वागावे? याचीही माहिती त्यांच्या कृतीतून आणि अनुभवातून होत असे.

माणूस कितीही मोठा झाला तो शिकला किंवा श्रीमंत झाला तरी त्यांनी जुने दिवस कधीच विसरू नये ही भावना व प्रेरणा मला नेहमीच त्यांच्याकडून मिळत राहीली. सर उच्च पदावर काम करत असले तरी त्यांची राहणी नेहमी साधी व सरळ असायची. सरांच्या शिस्तीचा कडकपणाचा कधीकधी राग सुद्धा यायचा परंतु ते आपल्या भल्यासाठी, प्रगतीसाठी सांगतात हे खूप उशिरा समजण्यात आले. कारण म्हणतात ना "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते पिणारा गुरगुरलाच पाहिजे". जर शिक्षण हे माध्यम आपणास जगाच्या कुठल्याही स्तरावर पोहोचवण्याचे काम करते तर शिक्षकांनी हे महत्त्व ओळखायला हवे. माझ्या आदर्श शिक्षकांनी हे केले नसते तर कदाचित मी इथपर्यंत पोहोचलेली नसते. सरांचा स्वभाव अतिशय तापट होता, ते कोणताही निर्णय अतिशय जलदरीत्या घेत. त्यांच्या सहवासात राहून बऱ्याच गोष्टी अंगीकारता आल्या. सध्या सर प्राचार्य म्हणून नियुक्त असले तरी ते त्यांच्या स्तरावर विविध उपक्रमात सहभागी होतात. वाघ सरांसारखे व्यक्तिमत्व लाभणं खूप भाग्याचे म्हणते, त्यांच्यावरती खूप काही लिहिण्यासारखा आहे त्यासाठी शब्द कमी आहेत म्हणून शेवटी पुन्हा एकदा त्यांना माझ्याकडून प्रणाम!!



**श्रीमती वाघे सविता सुभाष**

**हजेरी क्रमांक - ३६**

**"आई - वडिलांनंतर आयुष्याला दिशा देण्याचं काम करण्यामध्ये सर्वात मोठा वाटा शिक्षकांचा आहे ".**

# "माझे आदर्श शिक्षक"



## श्री. सतीष मुजळगेकर उर्फ कांबळे सर

## जिल्हा परिषद हायस्कूल शाळा लोणी बुद्रुक

माझे शिक्षक शिक्षक म्हणलं की आपले आवडीचे शिक्षक आपल्या डोळ्यापुढे येतात. आणि शिक्षक डोळ्यापुढे आले की त्यांचा आदर्श ही आपल्या डोळ्यापुढे येतो. तसेच मला माझ्या शाळेतून एक निबंध लिहिण्यासाठी विषय मिळाला विषयाचं नाव होतं माझे आदर्श शिक्षक आणि हे शब्द ऐकताच मला माझे आदर्श शिक्षक माझ्या डोळ्यासमोर दिसले .ते म्हणजेच सतीश मुजळगेकर सर आम्ही त्यांना सगळे कांबळे सर म्हणूनच बोलायचं कारण ते एक अगोदरच्या कांबळे सरांच्या बदलीवर आले होते. त्यामुळे त्यांना सगळेजण कांबळे सर कांबळे सर असेच हाक मारत असतात. आणि त्यामुळे त्यांचं खरं नाव आम्हाला खूप नंतर समजलं. मुजळगेकर सर म्हणजे इंग्रजी विषय शिकवणारे सर होते. त्यांच्याविषयी सांगावे तितके कमी कारण मी आठवीत असताना ते सर आम्हाला लाभले. लहानपणापासून खूप सर मॅडम आम्हाला येऊन गेले.

पण आत्ताही मला त्यांचे शिस्तीचे शिक्षण लक्षात आहे .मी जिल्हा परिषद शाळेत असल्यामुळे पहिली ते सातवीचे शिक्षण तिथे झाले .आणि आमचे गाव खेडेगाव असल्यामुळे शिक्षणाचे त्या टायमिंगला एवढे कोणी मनावर घेतले नव्हते. शाळेत जाण्याचे फक्त एवढेच कारण वाटायचे की थोडीशी मुलांना शिस्त लागेल. आणि दिवसभर घरी बसून करायचे काय त्यापेक्षा शाळेत आपले दिवसभर अटकून राहतील असं सर्व आई-वडिलांना वाटायचं. पण जेव्हापासून आमच्या गावामध्ये मुजळगेकर सर आले तेव्हापासून शाळेची पूर्ण शिस्तच बदलली. शिस्त म्हणजे मुजळगेकर सर हे पूर्ण गावांमध्ये जाऊन मुले जर शाळेत आली नसली तर त्यांना ते घेऊन यायचे आणि त्यानंतर आई-वडिलांनाही देखील ते मीटिंगसाठी बोलवायचे आणि सर्वांना सांगायचे की सर्वांना ही सक्तीचे शिक्षण घेणे आवश्यक आहे.असे बजावले होते आणि तेव्हापासून आमच्या गावातील सर्व नागरिक त्यांचे ऐकू लागले .म्हणून मला सर्व काही त्यांच्या बद्दल अजूनही आठवते .तेव्हापासून ते आमचे प्रेरणास्थान म्हणून ओळखले मीच एक अशी नाही ते फक्त माझेच आदर्श शिक्षक आहेत आमच्या गावातील मुलांना मुलींना घडवले आणि ते आत्ता नांदेड जिल्हा या ठिकाणी ते शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. पाच वर्षात आमच्या गावाचा विकास त्यांनी एवढे छान पैकी केला की अजूनही जेवढे मुलं त्यांच्या हाताखाली शिकून गेलेत तेवढे सर्वजण त्यांच्या कॉन्टॅक्टमध्ये आहेत .मी जरा मुंबई या ठिकाणी आता असल्यामुळे त्यांच्या कॉन्टॅक्टमध्ये राहू शकत नाही. आणि आता कसं लग्न झाल्यामुळे पूर्ण कॉन्टॅक्ट बंद झालेले आहेत .आता अधून मधून मित्र-मैत्रिणीकडून त्यांच्याबद्दल ऐकायला मिळतं पण लांब असल्यामुळे भेटायला काही मिळत नाही.

मी दहावीच्या वर्गात असताना माझे लग्न ठरले .तेव्हाचा हा किस्सा मला सांगावसं वाटतो. कारण माझे हे आदर्श शिक्षक

Edit with WPS Office

आहेत यांनी मला एक ते दोन वर्ष शिक्षण घेण्यासाठी आणि माझ्या आई वडिलांना तुमच्या मुलीला शिकू द्या ती हुशार आहे .तिला पूर्ण करू द्या तिची शिक्षण असे सांगून तेवढी दहावी काढू दिली .पण काय करणार दहावीच्या नंतर दुसरी शिक्षक लाभले. आणि त्यानंतर अकरावी झाली तेव्हा माझे लग्न झाले. तशी आमच्या घरची परिस्थिती चांगली होती .आम्ही चार बहिणी असल्यामुळे आणि माझे वडील व्यसने असल्यामुळे सर्वच काही घरातील वातावरण एवढे चांगले नव्हते. तेव्हाही सरांनी सांगून माझे लग्न दोन वर्ष पुढे ढकलले मी कसे विसरणार त्यांना माझ्यासाठी एवढे काही केले.

आता आपण बघूया जरा माझ्या शाळेतील गमती जमती साधारण आता पंधरा वर्षे झाले त्या गोष्टीला आम्हाला रोज इंग्रजीचे दहा शब्द देत गेले तेव्हा सर मात्र एवढी शिस्तीचे होते की फळ्यावर शब्द आणि अर्थ उच्चार सगळं काही लिहून द्यायचे आणि दहा मिनिटाच्या नंतर ते आम्हाला पुन्हा विचारायचे नाही जमलं तर हातावर छडी मिळायची म्हणून सर्व मुले शब्द लवकर लवकर पाठ करायचे .त्यांच्या अगोदर आम्हाला शब्द पाठ कसे करायचे ते त्यांनी आम्हाला सांगितले होते. काही मुलांना समजले काही मुलांना नाही समजले पण त्यांनी ।दिलेले शब्द माझ्या खूपच लवकर लक्षात बसायचे त्यांची पाठ करून घेण्याची पद्धत मला लवकरच जमली काहींना त्या दिवशी मार खाल्ला पण त्या दिवसानंतर सर्वांनी असे काही शब्द पाठ करायला लागले .की नंतर ती पद्धत कोणीच विसरले नाही .त्यांनी ठाम निश्चय केला होता की या मुलांना इंग्रजी वाचता लिहिता बोलता आली पाहिजे .म्हणूनच ते माझे आदर्श शिक्षक आहेत.

शाळेतील सुधारणा ही त्यांनी खूप छान प्रकारे केली. ही शाळेच्या मैदानात आमच्या खेळाचा रोज एक तास असायचा या अगोदर कधी हा तास आम्हाला खेळायला मिळाला नव्हता. असाच उठांगपटन करत गेलो.आम्ही पण खेळण्याच्या बाबतीतही त्यांनी आम्हाला खूप प्रोत्साहन दिले .तालुकास्तरीय खेळ खेळण्यासाठी त्यांनी आम्हाला नेले .त्यात आम्ही कबड्डीमध्ये खो-खोमध्ये नंबर पटकावला होता कारण की या आमच्या शिक्षकांनी आमची खूप छान प्रकारे तयारी करून घेतली होती .या अगोदर अशी कोणी तयारी केली नव्हती .त्यानंतर आम्हाला खेळण्याची आवड निर्माण झाली त्यातच फक्त आम्ही कबड्डीतच नाही तर अनेक प्रकारे खेळ त्यांनी आमच्याकडून घ्यायचे आमच्या शाळेत अगोदर मुलेच क्रिकेट बॅडमिंटन खेळायचे पण त्या सरांना आम्ही विचारले .की सर आम्हाला पण सर्व मुलींना क्रिकेट बॅडमिंटन खेळायचे आहे .तेव्हाही बाकी सर्वांचा नकार होता .पण आमचे मुजळगेकर सरांनी स्वतः आम्हाला क्रिकेट खेळण्यासाठी गावाबाहेरील मैदानात नेले .आणि आम्हा मुलींना पण क्रिकेट बॅडमिंटन आणि आम्हाला मुलींना पण शिकवले .आणि जिल्हास्तरीय क्रिकेट मॅच आम्ही खेळलो .आमचा सराव काही जास्त नसल्यामुळे तेव्हा आम्ही हरलो. पण सरांनी आम्हाला सराव करायचे थांबवले नाही. आणि सरांनी आम्हाला पुन्हा तालुक्यात खेळायला नेले तेव्हा मात्र आम्ही जिंकलो .आम्ही खूप खुश झालो आणि तेव्हा सर आमचे तिथून जवळच राहत असत तालुक्यात तेव्हा त्यांनी आम्हाला त्यांच्या घरी नेले नाष्टा चहापाणी करून नंतर घरी घेऊन गेले. आमच्या घरी गेल्यावर सर्वांनी खूप छान प्रकारे आमचे स्वागत केले .ते फक्त आणि फक्त मुजळकेकर सरांमुळे म्हणूनच ते याबाबतीतही ते माझे प्रेरणास्थान आहेत.

अजून एक सुंदर असा किस्सा आहे .आमच्या शाळेतील मी आणि माझी चुलत बहीण निता आम्ही बहिणी मैत्रिणी जास्त होतो .आणि अजूनही आहोत. ते पण मुजळगेकर सरांमुळे त्याने आम्हाला लहान असताना बघितलं होतं ते अगोदरच ओळखीचे होते. पण तेव्हा आम्ही त्यांना खूप घाबरायचं नंतर समजलं की आता हे सर आम्हाला आठवीपासून आहेत .तेव्हा मी आणि नीता माझी मैत्रीण आम्ही दोघेही सरांना घरी चहा पिण्यासाठी नेले खरंतर तेव्हा सरांनी आम्हाला नावे दिली होती आणि त्याला तानी म्हणायचे आणि मला उषा म्हणायचे .आणि काही चुकलं तर आमच्या वेण्या ओढायचे .हळूच पटकन हे काम पूर्ण करा असं ते सांगायचे बघितलं तर मी सरांचा खूप कमी मार खाल्ला. कारण की मी सगळं काही त्यांचे

Edit with WPS Office

ऐकायचे .माझ्या वास्तव्यात मुजळगेकर शिक्षकांनी खूप काही केले तेवढे माझ्या आई-वडिलांनी मला सपोर्ट केला नाही .पण सरांनी मला खूप सपोर्ट केला. मलाच नाही तर गावातील शाळेचा निकाल शंभर टक्के कसा लागला पाहिजे. यासाठी त्यांचे अतोनात प्रयत्न असायचे .आणि त्यांनी ते करूनच दाखवले. .



नाव:- उषा बालाजी लोणी .


हजेरी क्र:-१८

**सुविचार**

**कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देऊन त्यापासून सुंदर मटके घडवतो त्याप्रमाणे शिक्षक बालपणाला योग्य सुरेख आकार देऊन परिपूर्ण व्यक्ती बनवतो.**

Edit with WPS Office

# " माझे आदर्श शिक्षक "



**सौ. कल्पना चव्हाण**

**नवजीवन हायस्कूल जयसिंगपूर**

"गुरुर्ब्रह्मा गुरु विष्णु

गुरुर्देवो महेश्वरा:

गुरु साक्षात परब्रम्ह

तस्मै श्री गुरुवे नम:"

एक छोटसं रोपट कालांतराने वाढत जाते मग त्याचं रूपांतर एका मोठ्या झाडात होतं.त्याचप्रमाणे एका विद्यार्थ्याला सुशिक्षित नागरिक बनवण्याचे काम हे एका शिक्षकाचे असतं.जे निस्वार्थपणाने अनेक विद्यार्थी घडवण्याचं काम करते.समाजाला सुशिक्षित बनवण्याचं काम करत असताना माझ्या आयुष्यामध्ये मला असेच प्रेमळ, उत्तम व्यक्तिमत्व,कलागुणसंपन्न असे बरेच शिक्षक मला भेटले.

त्यामध्ये माझी पहिली गुरु म्हणजे माझी आई. मी स्वतःला खूप भाग्यवान समजते, अशी आई मला मिळाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील एका छोट्याशा कुटुंबामध्ये आलेली माझी आई अतिशय प्रेमळ. तिच्या संस्कारामुळे आज आम्ही इथपर्यंत पोहोचलो आहोत. त्या काळात सुद्धा म्हणजे १९७५ साली माझ्या आईच माझ्या वडिलांशी लग्न झाले.सांगायचं तात्पर्य असं की  माझे वडील काही  शिकले नाही त्यांना लिहिता वाचता पण येत नाही आणि माझी आई मात्र सातवी शिकलेली आणि माझे वडील शेतकरी. आईच्या शिक्षणाचा उपयोग आम्हाला झाला. तिचे संस्कार आणि तिचा प्रेमळ स्वभाव आम्हाला खूप काही शिकवून जातो. आई-वडिलांना आम्ही तिघी मुली म्हणजे माझ्या आईने तीन मुलींना जन्म दिला पण कधीच आम्हाला तिच्या वागण्यात असं दिसून नाही आलं की तिला मुलगा नाही किंवा वंशाला दिवा नाही.घरी गरीब परिस्थितीमध्ये आम्हाला तिघींना उत्तम प्रकारचे शिक्षण दिलं. माझ्या आईला नेहमी वाटायचं की आम्ही तिघींनी खूप शिकावं खूप मोठं व्हावं आणि आम्ही तिघींनी पण त्यांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला म्हणून मी माझ्या आईला माझी पहिली गुरु मानते.

Edit with WPS Office

आई माझा गुरु, आई कल्पतरु,

सौख्याचा सागरु, आई माझी ।

प्रितीचे माहेर, आमृताची धार,

मांगल्याचे सार, आई माझी ॥

मी इयत्ता नववी मध्ये शिकत असताना आम्हाला चव्हाण मॅडम होत्या.जयसिंगपूर शहरातील नवजीवन हायस्कूल ही माझी शाळा.नववीला आम्हाला मराठी हा विषय चव्हाण मॅडम शिकवायच्या.गुरुचे स्थान हे आपल्या जीवनात खूप महत्त्वाचे असते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत माणूस शिकत असतो. कुंभार जसा मातीच्या गोळ्याला आकार देतो आणि चांगली वस्तू घडवतो तसेच शिक्षक हे विद्यार्थ्यांना घडवत असतात.

भारतीय संस्कृतीमध्ये शिक्षकाला खूप महत्त्व दिले जाते तसेच चव्हाण मॅडम आम्हाला नुसतं पुस्तकी ज्ञान देत नव्हते तर व्यावहारिक ज्ञान तसेच अध्यात्मिक ज्ञान सुद्धा देत होत्या. विद्यार्थ्यांना सर्वगुण संपन्न कसे बनवता येईल यासाठी त्या खूप प्रयत्नशील असत.

नवजीवन हायस्कूलमध्ये 22 शिक्षक होते त्यातील काही शिक्षक प्रेमळ होते परंतु मला कोणीही विचारू देत की तुझा आवडता शिक्षक तर सगळ्यात पहिला ओठावर नाव येते ते म्हणजे माझ्या नववी आणि दहावीच्या मराठीच्या शिक्षिका चव्हाण मॅडम. त्यांच्या हस्ताक्षर खूप सुंदर व रेखीव होते. एखादा पाठ शिकवताना तो आपल्या परिसरात घडणाऱ्या घटना व गोष्टींचा उदाहरण देऊन आपल्या भाषेत आम्हाला शिकवत. त्याचबरोबर कविता आम्हाला शिकवताना त्या एकदम सुरेख आवाजात व सुरात गाऊन शिकवत त्यांचा आवाज खूप छान होता. त्यांचा चेहरा कायम आनंदीत असायचा. त्यांच्याकडे नेहमी पाहताना एक उत्साह यायचा. मॅडम वक्तशीर आणि शिस्तप्रिय होत्या त्यांनी आम्हाला एक नियम सांगितला होता की कोणत्याही ठिकाणी कामासाठी जाताना त्या ठिकाणी कमीत कमी अर्धा तास अगोदर पोहोचायचं त्यांचं हे वाक्य माझ्या नेहमी लक्षात आहे आणि तशी सवय लागली आहे मला.

चव्हाण मॅडम नेहमी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या परीक्षेस बसण्यास प्रोत्साहित करायच्या. नेहमी चांगले संस्कार तसेच अध्यात्म बद्दलही त्या बोलत असत. त्या नेहमी सांगायच्या ईश्वरावरती विश्वास ठेवा नामस्मरण करा. तसेच मुलगी वयात येताना काय काय बदल होतात आणि त्याची प्रोसेस कशी होते त्याबद्दल पहिल्या कोण बोलत असेल ते म्हणजे माझी आई आणि माझ्या चव्हाण मॅडम. त्यावेळी काही असे मोबाईल वगैरे काही नव्हते, जो काही ज्ञानाचा झरा व्हायचा तो एक आई आणि शिक्षक.

पूर्वी असं व्हायचं शिक्षकाने सांगितलेलं तेच ज्ञान बरोबर. आम्हाला काही अडचणी आल्या किंवा एखाद्या गोष्टीविषयी माहिती जाणून घ्यायचे असेल तर ती आपल्या शिक्षकाला विचारली जायची.पुढील वर्षी म्हणजे दहावीचा वर्ग आम्ही मुली दहावीत गेलो. माझ्या आवडत्या मॅडम चव्हाण मॅडम आमच्या वर्ग शिक्षिका झाल्या.त्या खूप छान मराठी शिकवायच्या. व्याकरण शिकवताना अगदी सोप्या भाषेत करून शिकवायच्या एखादी गोष्ट किंवा संकल्पना नाही समजली तर त्या पुन्हा पुन्हा कंटाळता शिकवत असत.

दहावीला असताना मला बोर्डाची परीक्षेची खूप भीती वाटते तेव्हा त्यांनी दहावीचा पेपर कसा लिहायचा कसा सराव करायचा हे समजून सांगितला मराठी.मराठी विषयाबरोबरच ते आम्हाला खेळ व्यायाम सूर्यनमस्कारांच्या बद्दल मार्गदर्शन करत असत. मुलींना पण खेळामध्ये सहभागी झाला पाहिजे व काय झालं पाहिजे याचे महत्त्व पटवून द्यायचे तसेच त्यावेळेस सुद्धा सूर्यनमस्कार मी पहिल्यांदा त्यांच्याकडून शिकले होते.

Edit with WPS Office

अशा या माझ्या आवडत्या चव्हाण मॅडम 2019 मध्ये सेवानिवृत्त झाल्या आहेत आता कुटूंबासोबत छान वेळ घालवत आहेत. आयुष्यामध्ये त्या माझ्या आदर्श शिक्षिका म्हणून माझ्या स्मरणात राहतील.



नाव: सविता मुळीक

हजेरी क्र : 22

Edit with WPS Office

# माझे आदर्श शिक्षक

नाव:   प्रमोद दामोदर देसले

शाळा: जिल्हा परिषद शाळा नांगरमोडा पो:न्याहाळे . बु  ता:जव्हार  जि. पालघर.

मी इयत्ता सातवी मध्ये जिल्हा परिषद शाळा नांगरमोडा होतो. त्यावेळी मला त्या शाळेत एक चांगले व्यक्तिमत्व असणारे शिक्षक लाभले. ते म्हणजे आमचे प्रमोद दामोदर देसले सर मी जेव्हा सातवीत होतो. तेव्हा मला धड वाचता ही येत नव्हतं. त्यामुळे मी वर्गात सर्वात शेवटच्या बाकावर जाऊन बसायचो. मला शिक्षकांची नेहमी खूप भीती वाटायची .त्या शाळेत नवीन शिक्षक आल्याने माझ्या मनात खूप भीती होती की हे  शिक्षक कसे असतील ते आपल्याला समजून घेतील की नाही हे विचार सारखे मनात यायचे. वाचता येत नसल्यामुळे मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नेहमी टाळाटाळ करात असे पण माझ्या ह्या कमतरता प्रमोद देसले सरांनी अचूकपणे हेरलल्या आणि मला वाचता यावे यासाठी ते दररोज मला एक पाठाचा परिच्छेद वाचायला लावायचे.

मी घाबरत घाबरत अडखळत त्या परिषदाचे वाचन करायचो.मी वाचत असताना मध्येच थांबत होतो. जेंव्हा अटकायचो तेव्हा सर तो शब्द मला सांगत होते. मग मी त्यांच्या मागे तो शब्द म्हणायचो.असा सराव करुन घेतल्याने  मी वाचायला लागलो. त्यांच्या मुळेच माझ्या मनात शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली . सरांचे विषयावरती खूप चांगले प्रभुत्व होते. ते शिकवताना अगदी सोप्या पद्धतीने शिकवत असत.यामुळे आम्हाला त्यांचं शिकवण आवडायचे . जी मुले सतत गैरहजर राहायची  सर त्या मुलांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेत . सरांच्या मनात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनं विषयी खूपच कळकळ होती.सर मराठी विषय शिकतांना  अनेक गोष्टी सांगत त्यामुळे त्यांच्या तासिकेला कधिच कंटाळा यायचा नाही. सरांनमध्ये वक्तशीरपणा खूप होता.ते शाळेत सर्व शिक्षकांच्या आधी उपस्थित राहायचे. विद्यार्थी शाळेत आल्यावर ते  विद्यार्थ्यांनं कडून शाळेची स्वच्छता करुन घ्यायचे.सर शाळेत आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करायचे. शारीरिक शिक्षणाच्या तासाला शाळेच्या मैदानात सर खेळ शिकवायचे. त्यांनी सांगितलेल्या  सूचनांचे पालन केले नाही तर ते त्या विद्यार्थ्याला तिथेच शिक्षा करायचे. त्यांचे विद्यार्थ्यांशी जेवढे  चांगले संबंध होते .तसेच गावातील लोकांशी ही ;चांगले संबंध होते.त्यांच्या या चांगल्या कार्याकडे बघूनच माझ्या मनात आपण असेच शिक्षक बनायचं ही इच्छा मनात निर्माण झाली. त्यावेळी शाळेत पुस्तकांची  खूप कमतरता होती. विद्यार्थ्यांना गटागटांनी पुस्तके दिली जायची. तेव्हा ते प्रत्येक गटाला नवीन प्रकारे गृहपाठ द्यायचे.एकदा आम्ही सर्व मुले मैदानावर खेळत होतो. खेळता खेळता आम्हां मुलांमध्ये भांडणं झाली.मुल एकमेकांना मारायला लागली. सर कार्यालयात होते, मैदानात चाललेला गोंधळ त्यांच्या लक्षात आला. ते कार्यालयांतून  लगेच बाहेर आले. सर्वांना रांगेत उभे केले आणि वर्गातून छडी घेऊन आले व हातावर छडीचा मार दिला.शाळेत अनेक बाबिंची कमतरता होती.पण सरांनी आहे त्या परिस्थितीत चांगल शिकवण्याचा प्रयत्न केला.

सरांच्या मनात शिक्षणा विषयी खुपचं तळमळ होती. त्यांचे विद्यार्थ्यांप्रमाणे गावातील ग्रामस्थांशी चांगले संबंध असल्यामुळे गावातील ग्रामस्थ सुद्धा त्यांना प्रत्येक कार्यामध्ये सहकार्य करायचे.सर विद्यार्थ्यांची दररोज गायनाची तयारी करुन घ्यायचे . त्याचप्रमाणे विविध प्रकारचे चित्र आम्हाला काढायला लावायचे.मला तर चित्र चांगलं कधिच काढता आलं नाही.  सर मला पेन्सिल कशी पकडायची चित्र कसे काढायचे हे व्यवस्थित समजावून सांगत. पण तरी मला चांगले चित्र कधीच काढता आले नाही. माझा गणिताचा पाया तर अगदी खूपच कच्चा होता. मला साधी साधी

Edit with WPS Office

उदाहरणांनी नीट सोडवता येत नव्हते. सरांनी मुलांना गणित यावे यासाठी खूप प्रयत्न केले. पण आज पर्यंत माझे गणित काही पक्के झाले नाही. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी आम्ही नेहमीच कंटाळा करायचो. यामुळे सर आमच्यावर नेहमीचं ओरडायचे. सरांनी जर आमच्याकडून चांगली तयारी करून घेतली नसती तर आज मी हे पुढील शिक्षण घेऊ शकलो नसतो. आज अठरा वर्ष पूर्ण झाली पण सरांची आणि माझी भेट झाली नाही. पण आजही त्यांच्याविषयी माझ्या मनात खूप आदर आहे.त्यांच्या या चांगल्या कार्यामुळेच ते माझ्यासाठी आदर्श शिक्षक आहेत.माझा भाग्य चांगल की,मला आदर्श व्यक्तिमत्व असणारे शिक्षक लाभले.



**(नाव:नितेश संतू कोरडा )**

**(हजेरी क्रमांक:१६)**

सुविचार: या हृदयीचे त्या हृदयी देता येते तोच खरा शिक्षक

Edit with WPS Office

# "माझे आदर्श शिक्षक"



**सौ एस.एस.पाटील मॅडम**
**न्यू इंग्लिश स्कूल कामोठे**

शिक्षक- शब्दांनी ज्ञान वाढवणारे
जगातून जीवन घडवणारी
मूल्यातून तत्वे शिकवणारी
समाजाला योग्य दिशा दाखवणारे

प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये शिक्षकाला अमूल्य स्थान असते आई वडील हे आपले पहिले गुरु असतात तर शिक्षक हे आपले दुसरे गुरु असतात शिक्षक आपल्याला शिकवतात चांगले संस्कार देण्याचे महान कार्य करतात विद्यार्थ्यांच्या चिमुकल्या पंखात आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य शिक्षक निर्माण करतात.

शिक्षक हा देवा पेक्षा वर मानला जातो शिक्षक आपल्या आयुष्यात मेणबत्ती सारखे प्रकाश आणतात प्रकाश म्हणजे शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना योग्य मार्ग दाखवणे शिक्षक सहिष्णुता शिस्तबद्ध जीवन जगण्यासाठी योग्य-अयोग्य आणि चांगले आणि वाईट यात फरक करण्यास शिकवतात शिक्षक नसता तर शाळा नसती जर शाळा नसती तर आम्ही संस्कृत नागरिक झालो नसतो विद्यार्थी त्याच्या गुरुशिवाय अपूर्ण असतो. शिक्षक विद्यार्थ्याला केवल विषयाचे ज्ञान देत नाही तर जीवनातील चांगला आणि खरा माणूस बनवण्यासाठी प्रेरणा देतो.

काही शिक्षक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये इतकेच चांगले शिकवतात आणि विद्यार्थ्यांमध्ये मिसळतात किती त्यांचे आवडते बनतात काही शिक्षक आम्हाला इतकी प्रिय होतात की ते आमचे आदर्श बनतात.शिक्षणाच्या प्रवासात मन घडवण्यात ज्ञान मार्गदर्शन आणि प्रेरणा प्रदान करण्यात त्या महत्त्वाची भूमिका बजावतात.

माझ्या शैक्षणिक वाटचालीवर कायमस्वरूपी प्रभाव टाकणाऱ्या अनेक शिक्षकांमध्ये एस.एस.पाटील मॅडम यांचे माझ्या हृदयात विशेष स्थान आहे त्यांची शिकवण्याची आवड अविचल समर्पण आणि अनोखी शिकवण्याची शैली त्यामुळे त्या माझ्या आदर्श शिक्षिका बनल्या माझ्या मते शिक्षक ही देवाने दिलेली सुंदर भेट आहे शिक्षक हा देवासारखा आहे कारण देव संपूर्ण जगाचा निर्माता आहे आणि शिक्षक हा एका चांगल्या राष्ट्राचा निर्माता आहे शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा प्राणी आहे जो आपल्या संपूर्ण जीवनातला त्याचा ज्ञान संयम प्रेम आणि काळजीने एक मजबूत आकार देतो.

शिक्षकांमध्ये अनेक गुण असतात आपल्या विद्यार्थ्यांचे जीवन यशस्वी करण्यासाठी तो प्रत्येक कलेत कुशल आहे शिक्षक खूप हुशार असतो विद्यार्थ्यांचे मन अभ्यासात कसे घालायचे हे शिक्षकाला माहीत असते अध्यापनादरम्यान शिक्षक सर्जनशीलता वापरतो जेणेकरून विद्यार्थी एकाग्र होऊ शकेल शिक्षकाचे ध्येय म्हणजे मुलांना ज्ञानी आणि सुसंस्कृत बनवणे जेव्हा एखाद मूल घर सोडून शाळेत प्रवेश करते तेव्हा तो शिक्षकांच्या आश्रयाला जातो शिक्षक शाळेतील मुलाचे पालक आहेत ते मुलांना आयुष्य जगायला शिकवतात म्हणून मी माझ्या शिक्षकाचे आभारी आहे आणि त्यांच्या समर्पणाला मी नमन करते.

शिकवण्याची शैली आणि त्यांच्या लाडक्या शिक्षकाचे महत्त्व व व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांवर ठसवले जाते विद्यार्थी शिक्षकाशिवाय क्षण पूर्ण करू शकत नाही शिक्षकाच्या शिकवणीमुळे आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे पालन केल्यामुळे त्यांच्या शिष्यांना यश मिळते जीवनात शिक्षकाचे स्थान मानवासाठी सर्वोच्च आहे हेच कारण आहे की शिक्षकाला ईश्वरापेक्षा जास्त स्थान दिले जाते. माझी आवडती शिक्षिका आणि आदर्श शिक्षिका एस.एस.पाटील मॅडम या आहेत या माझ्या वर्ग शिक्षिका देखील होत्या एक कडक शिक्षिका पण त्यांचा स्वभाव खूप मजेदार आणि वक्तशीर ही आहेत त्या फक्त माझ्याच नाही तर सर्व वर्गाच्या आवडत्या आणि आदर्श शिक्षिका असाव्या.

एस.एस.पाटील मॅडम यांनी वर्गखोली ही केवळ शैक्षणिक प्रवचनासाठीचिच जागा नाही तर हे बौद्धिक शोधाचे आश्रयस्थान आहे जेथे कल्पना फुलतात आणि कुतूहल जागृत होते त्याची शिकवण पारंपारिक सीमा ओलांडते असे वातावरण निर्माण करत जे केवळ बुद्धीचेच नव्हे तर आत्म्याची ही पोषण करते एस.एस.पाटील मॅडम या केवळ शिक्षिका नाहीत तर त्या एक प्रेरणास्त्रोत मार्गदर्शक आणि ज्ञानाचा दिवा आहेत त्याचा शिक्षणाचा दृष्टिकोन हा पाठ्यपुस्तकांच्या पलीकडील आहेत यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो हे त्यांचे मत होते त्यांच्या वर्गात शिकणे म्हणजे केवळ माहितीचे हस्तांतर नाही तर एक परिवर्तनशील अनुभव आहे तो कुतूहल आणि गंभीर विचारांना वाढवतो.

WPS Office

एस.एस.पाटील मॅडमच्या उल्लेखनीय गुणांपैकी एक गुण म्हणजे त्यांची शिकवण्याची अतूट आवड त्यांचा शिकवण्याकरिता जो उत्साह होता तो म्हणजे पुरस्कार देण्याजोगा होता वर्गात असे वातावरण निर्माण करत जी अगदी आव्हानात्मक देशांमध्येही रस निर्माण करत हे केवळ सत्य लक्षात ठेवण्याबाबत नाही तरी समजून घेणे कौतुक करणे आणि ज्ञान लागू करणे याबद्दल आहे पारंपारिक अध्यापनाच्या पलीकडे एस.एस.पाटील मॅडम या आपल्या विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवणाऱ्या मार्गदर्शक आहेत त्याचे अतुलनीय समर्थन आणि प्रोत्साहन आत्मविश्वास वाढवते विद्यार्थ्यांना उच्च ध्येय ठेवण्यासाठी आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी चिकाटी ठेवण्यास सक्षम करते त्यांच्या वर्गात चुका अपयश नसून वाढ आणि आत्मशोधाच्या दिशेने पाऊल टाकतात.

विषयाव्यतिरिक्त त्या आम्हाला चांगले आचार शिकवत आणि शिष्टाचार देखील विद्यार्थ्यांना चरित्रवाणी बनवत त्यांची शिकवण नेहमी कठीण परिस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास त्या नेहमी समर्थ असत त्या आम्हाला नेहमी म्हणत की जर तुम्हाला तुमच्या आयुष्यात खरोखर यशस्वी व्हायचे असेल तर तुम्ही तुमच्या शिक्षकांनी सांगितलेल्या गोष्टींची काळजी आणि आयुष्यभर त्यांचे पालन करा ती कमकुवत आणि हुशार मुलांमध्ये भेदभाव करत नाहीत ती कमकुवत मुलांना खूप आधार देते आणि हुशार मुलांना कमकुवत वर्ग मित्रांना मदत करण्याची विनंती करते आम्हाला सांगतात की आपण आपल्या अभ्यास आणि जीवनाचा हेतू याबद्दल गंभीर असले पाहिजे.

शि म्हणजे शिल

क्ष म्हणजे क्षमा

क म्हणजे कला

ज्यांच्याकडे शील शमा व कला यांचा त्रिवेणी संगम आहे तोच खरा शिक्षक होय शिक्षक म्हणजे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणारा खरा शिल्पकार आहे.

जो द्रव्य वाढवितो

तो काळजी वाढवतो

परंतु जो विद्या वाढवितो

तो मान वाढवितो

हे कार्य फक्त शिक्षकच करतो

WPS Office

आज जरी प्राचीन गुरु शिष्य परंपरा संपलेली दिसत असली तरी शिक्षकाचे कर्तव्य त्याच जागी कायम आहे पण मिळविण्यासाठी आजही चिकाटी परिश्रम त्याग नियमितता नम्रता असे गुण आत्मसात करण्याची गरज आहे विद्यार्थ्यांना घडवतात तो त्यांना मार्गदर्शक करतो ते विद्यार्थ्यांचा गोंधळ दूर करतात ते त्यांच्यामध्ये धैर्य संयम संयुष्नता प्रामाणिकपणा सारखे गुण रुजवतात.

शेवटी एस.एस.पाटील मॅडम या केवळ शिक्षिका नाहीत त्या शिक्षणाचा मार्ग प्रकाशित करणारा मार्गदर्शक प्रकाश आहे त्यांची आवड समर्पण आणि शिकवण्याचा सर्वांगीण दृष्टीकोन माझ्या आवडत्या शिक्षिका व आदर्श शिक्षिका बनव आपण शिकण्याच्या गुंतागुंतीच्या प्रवासात शोधा शोध करत असता.

एस.एस.पाटील मॅडम प्रेरणेचे प्रतीक म्हणून उभ्या राहतात जे आपल्याला शैक्षणिक उत्कृष्टता वैयक्तिक वाढ आणि आपल्या सभोवतालच्या जगातले सखोल आकलन करण्यासाठी मार्गदर्शन करतात एक अशा मार्गदर्शक ज्या आपल्या विद्यार्थ्यांच्या हृदयावर आणि मनावर कायम प्रभाव टाकतो हे विचार लिहिताना मला आठवण होते की एस.एस.पाटील मॅडम यांच्यासारख्या महान शिक्षिका केवळ शिक्षिका नसतात तर ते भविष्यातील शिल्पकार स्वप्नांचे शिल्पकार आणि एक उत्तम आदर्श शिक्षक असतात जे शिक्षणाचा प्रवासात अमूल्य योगदान देणारे आहेत.



रोहिणी बापूराव पठाडे
हजेरी क्रमांक 25

**"शिक्षक ज्ञानाचा दीप असतो, जो अज्ञानाच्या अंधारात उजेड देतो."**

# "माझे आदर्श शिक्षक"



**सौ.वर्षा साळवे**

**लाल बहादूर शास्त्री विद्यालय, दिघा ठाणे.**

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये त्याला आपले ध्येय साध्य करण्यासाठी गुरुची गरज तर असते. आपला जन्म झाल्यानंतर प्रथम आई -वडील हे आपले गुरु असतात. ते आपल्याला चालायला,वागायला, बोलायला इतरांशी कसे वागावे अशा अनेक गोष्टी शिकवतात. चांगले संस्कार करतात. आपली प्रत्येक गरज पूर्ण करण्यासाठी ते प्रयत्न करत असतात. एखाद्या गोष्टीसाठी नकारही देतात. ती गोष्ट आपल्यासाठी किती चांगली किंवा वाईट आहे याबद्दल योग्य ते मार्गदर्शन करतात. आई -वडील त्याचप्रमाणे घरातील इतर व्यक्तींचाही आपल्यावर संस्कार करण्यावर हातभार असतो. आई- वडिलांबरोबरच आपल्या आयुष्यामध्ये महत्त्वाचे गुरु म्हणजे आपले शिक्षक.

'शिक्षक' म्हणजे आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग आहे. आपण पाठ्यपुस्तकातील धडे तर शिकतोच. परंतु खऱ्या आयुष्यातील जगणे ही एक परीक्षा किती महत्वाची आहे, याबद्दल मार्गदर्शन प्रेरणा देण्याचे काम शिक्षक करतात. माझ्या शाळेचे नाव लाल बहादूर शास्त्री विद्यालय, दिघा असे होते. या शाळेमध्ये मी पहिली ते चौथीपर्यंत शिकली. त्या शाळेमध्ये अनेक शिक्षक होते. त्यातीलच इयत्ता चौथीला मला साळवे बाई वर्गशिक्षिका होत्या,त्या आमच्या वर्गाला सर्व विषय शिकवित असत. त्यांचा स्वभाव अगदी कोणालाही आवडेल असा होता. सतत आनंदी चेहरा हसरा असणाऱ्या साळवे बाई माझ्या आवडत्या शिक्षिका आहेत. आपण उत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात जातो तसतशी आपल्यामध्ये उत्सुकता निर्माण होते.कोण शिक्षक व शिक्षक आपल्याला शिकवायला असतील त्यांचा स्वभाव वागणे,बोलणे यासारख्या गोष्टींची मनात घालमेल तर होतीच.अखेर जून महिन्यातील १५ तारखेला शाळेचा पहिला दिवस आला.त्या दिवशी मित्र -मैत्रिणींना भेटण्याची उत्सुकता वाढत चालली होती त्यांच्याच बरोबर गप्पा मारणे,नवीन खरेदी केलेल्या गोष्टींबद्दल बोलणे,मधल्या सुट्टीच्या वेळेत आपला डब्बा सगळ्यांवरून मिळून मिसळून खाणे यासारख्या गोष्टींचा आनंद वाटू लागला होता, शाळेची घंटा वाजली. आम्ही सर्व विद्यार्थी शाळेच्या मैदानात रांगेन उभे राहिलो त्यानंतर परिपाठ झाला व आम्हाला सांगण्यात आले की,तुम्ही तुमच्या वर्गात जाऊन बसा.

वर्गात गेल्यानंतर सगळ्यांचा दंगा सुरू होताच तितक्यात वर्गाच्या दारावर साळवे बाई आल्या. त्यानंतर मात्र थोड्या कमी आवाजात आम्ही एकमेकांबरोबर कुजबुज करायला लागलो. या कोण आहेत कधी आपण यांना या शाळेत तर पाहिले नाही बाई वर्गाच्या आत आल्यावर सौम्य आवाजात म्हणाल्या शांत बसा. मी तुमची वर्गशिक्षिका आहे. त्यानंतर त्यांनी स्वतःचे नाव वगैरे सांगितले. मग एक-एकाला उठवून त्यांचे नाव,मागच्या वर्षी किती टक्के मिळाले,तुमचा छंद वगैरे थोडक्यात माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी वर्गाचा मॉनिटर याची निवड केली. तसेच त्यांच्या अनुपस्थितीत मॉनिटर मुलांना शांत ठेवण्याचे काम तसेच आमच्याकडून एखाद्या विषयाची उजळणी करून घेणे यासारख्या गोष्टी घेत असे. त्यांचे शिकवणे मला आवडत असे एखादा मुद्दा समजावून झाला की, लगेच त्याचे उत्तर आमच्याकडून तोंडपाठ करून घेते. तसेच तो मुद्दा त्यांनी कसा शिकवला हे ही सविस्तर करून सांगा असे सांगत त्यांच्या या गोष्टी मुळे सर्व विद्यार्थी बऱ्यापैकी अभ्यास करत असत. त्यात रोजच्या रोज नवीन काय तरी शिकू लागलो. फळ्यावर आम्हाला सांगितलेल्या मुद्द्यांबद्दल मांडणी करायला लावल्यामुळे सतत तेच प्रयोग करून मुलांना काही प्रश्नांची उत्तरेही चटकन येत असत. त्याचबरोबर मैदानी खेळ या गोष्टी सुद्धा अव्वल असणे किती महत्त्वाचे याचे महत्त्व पटवून दिले. अभ्यासासाठी आवड निर्माण तर झाली त्याचबरोबर मैदानी खेळाचीही झाली.

डिसेंबर महिना सुरू होताच वार्षिक स्नेहसंमेलन यासारखे कार्यक्रम सुरू होत. त्यामध्ये भाग घेण्यासाठी कोणी

तयार होत नसत, बाईंनी विचारले का बर? तुम्ही यामध्ये भाग घेत नाही तर विद्यार्थी बोलले आम्हाला काही जणांना धड नाचता येत नाही, तर आम्ही काय सहभाग घेणार तर त्यावर बाई म्हणाल्या  की, तुम्ही जर एखाद्या गोष्टीचा प्रयत्न केला नाही तर ते तुम्हाला येणार नाही. पुढे त्या म्हणाल्या की,

" बालपण म्हणजे मज्जा,धमाल आणि मस्ती..

जिथे कोणालाच नसते,मोठ्यांची धास्ती...

जिथे नसतात गुरुजी,बाई मग कशाला

बाळगायची भिती..."

बालपण हे एका 'फुलासारखं' असतं कोमजलं तर ते कधीच उमलत नसतं. म्हणून बालपण जपायचं असतं. त्यानंतर आम्ही स्पर्धेत भाग घेण्यासाठी थोडा उत्साह दाखवला. तास संपल्यानंतर अधिकचा वेळ थांबून त्यांनी आमच्याकडून नृत्याचा सराव करून घेतला बऱ्यापैकी नृत्य करण्याचा प्रयत्न आम्ही करत होतो परंतु मध्ये मध्ये आम्ही नृत्याच्या स्टेप( पायऱ्या) विसरत होतो रंगमंचावर असलेल्या पडदया मागून त्या आम्हाला विसरलेल्या स्टेप सांगत होत्या. अशा प्रकारे स्नेहसंमेलनाचा दिवस तर गेला, पण त्या दरम्यान बाईंनी आमची वेशभूषा, केशभूषा चांगली व्यवस्थित दिसण्यासाठी घेतलेली मेहनत त्यातून त्यांचे आमच्याबद्दलचे प्रेम दिसून आले. त्यातून आमच्या पालकांना पण समजले की आपल्या पाल्याच्या वर्गशिक्षिका या प्रेमळ, जबाबदार आहेत.

शाळेची शैक्षणिक सहल जाणार होती आणि सगळेजण फारच खुश होतो. गणवेशाला कडकडीत इस्त्री आईला मारायला लावली. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही शाळेत गेलो होतो तिथून चालत चालत आमचे शिक्षक व आम्ही सहलीच्या ठिकाणी पोचलो. जेथे सहल गेली होती ते अंतर फार काय लांब नव्हते शाळेपासून ३० मिनिटांच्या अंतरावर होते. त्या डोंगराच्या पायथ्याशी सुंदर असा छोटासा एक तलाव होता त्याच्या अगदी शेजारी गावदेवी आईचे मंदिर होते तिथे गेल्यावर आम्हाला काही सूचनांचे पालन करा असे वारंवार सांगत होते. सर्वजण गोलाकार बसून खेळ खेळलो. गोष्टी केल्या त्या नंतर आपले डबे सर्वांबरोबर मिळून खाल्ले. घरी येत असताना आम्हाला आमच्या वर्ग शिक्षक वर्गशिक्षकांनी खाऊ दिला.

एक उत्तम वर्गशिक्षिका तर होत्याच परंतु, अडचणीच्या वेळेस मदत करणाऱ्या अशी त्यांची ओळख होती. विद्यार्थ्यांच्या समस्या यावर त्या काटेकोरपणे लक्ष द्यायच्या व त्यांचे प्रश्न सोडवायचे. वर्गामध्ये रोज तास झाल्यानंतर परीक्षा घ्यायच्या त्यामुळे मुलांना शिकवलेले समजले की,नाही ते त्यांना समजायचे. असेच एकदा आम्ही रविवारच्या सुट्टीनंतर सोमवारी शाळेत गेलो. तेव्हा  आम्हाला सांगितले की तुमची आज परीक्षा. आम्ही पण काय करणार आहोत जे होईल ते बघू म्हटलं बाई एक- एकाला उठून प्रश्न विचारत. ज्याला उत्तर नाही यायचं त्याला छडी द्यायच्या जितक्या प्रश्नांची उत्तरे चुक तितक्या छड्या तर मिळायच्याच पण त्याचबरोबर तेच प्रश्न उत्तरासहित पाच -पाच वेळा लिहून आणणे. मुलांना आता समजले होते की, आपल्याला उत्तर नाही आली तर छड्या मिळतीलच त्याचबरोबर प्रश्नांची उत्तरे लिहून आणावे लागतील तेही ते पाच वेळा म्हणून मुले पुढच्या वेळेस पासून आपल्याला छडी मिळणार अशा तयारीत येऊ लागली. ते म्हणतात ना...

" छडी लागे छम छम...

विद्या येई घम घम..."

२६ जुलै २००५ रोजी ढगफुटीमुळे मुंबईत खूप पाऊस झाला. त्यादिवशी शाळेतून घरी जात असताना शाळेच्या जवळ छोटा होता आणि पाण्याचा प्रवाह इतका वाढला होता की, ओढ्याचे पाणी ज्या दिशेने जात होते त्या दिशेने मला ते घेऊन जात होते. ते सर्व बाईंनी पाहिलं तर त्यांच्या हातातील सामान खाली ठेवले. स्वतःचा विचार न करता त्या माझ्याजवळ आल्या.त्यांनी मला पकडून त्यांच्याजवळ खेचले. मी घाबरले होते पण बाईंनी सावधगिरी बाळगून मला वाचवले होते आणि सुखरूप माझ्या घरापर्यंत पोहोचवले. माझ्या आयुष्यातील ही अविस्मरणीय गोष्ट आहे. मी स्वतःला खूप भाग्यवान समजते

अशा शिक्षिका मला लाभल्या. आम्ही चांगले घडावे यासाठी नियमांचे पालन, आदर, काळजी, प्रेम यासारख्या गोष्टी दिल्या.

आपल्याला एखादी गोष्ट येत नसल्यास त्याचा सराव करावा. परंतु आपल्याकडून होईलच हा सकारात्मक दृष्टिकोन दिला. त्यातून एक गोष्ट मी शिकली की,

" हसणे रडणे चुकणे धडपडणे

पडून परत उभे राहणे म्हणजे आयुष्य...

विचारातून मार्ग काढत पुढे जाणे

आयुष्य म्हणजे नवीन दिशा नवीन स्फूर्ती

आयुष्य म्हणजे सकारात्मक वृत्ती..."



श्रीमती. दर्शना पांडुरंग भोवर

हजेरी क्रमांक :-२

" शिक्षक  समाजातील सर्वात आदरणीय व्यक्ती होय. "

# "माझे आदर्श शिक्षक"



**डॉ.श्री. प्रदिप सरवदे**

**प्राध्यापक**

**भौतिक शास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ**

आज महाविद्यालयामध्ये निबंध स्पर्धेच्या निमित्ताने विषय दिले होते. विषय अगदी सरळ आणि सोपाच होता."माझे आदर्श शिक्षक"हे ऐकताच माझ्या डोळ्यासमोरून आत्तापर्यंतचा शाळेतील व विद्यालयातील प्रवास अगदी स्पष्टपणे राहिला.

शाळा म्हणजे ज्ञानमंदिर! शाळेतील आठवणींना उजाळा दिला आणि आठवला तो शाळेचा पहिला दिवस, मनामधील अनामिक भीती ,शिक्षकांचा मार, दैनंदिन अध्यापन, खेळ, सहल आणि सर्वात महत्त्वाच म्हणजे दुपारच्या सुट्टीत खाल्लेला डब्बा नाही का?? भाग्यवान आहे मी की स्वतःला घडवण्याच्या ह्या प्रवासात मला माझ्या सर्व शिक्षकांनी मुलाचे मार्गदर्शन केले आहे. मानवाच्या जीवनाची जडणघडण ही त्याच्यावर होणाऱ्या संस्कारांवर अवलंबून असते. आणि या संपूर्ण काळात उत्तम शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सहवास मिळाला तर त्याहून मोठे भाग्य नसावे असे मला वाटते. भौतिकशास्त्रामधून पदवी घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी मुंबई शहर गाठायचे हा निर्धार करून अखेरीस पद्युत्तर शिक्षणासाठी मुंबई विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागामध्ये प्रवेश घेतला. आणि पहिल्या दिवशी विद्यापीठात दाखल झाले. एवढा मोठा वर्ग, नवीन अनोळखी चेहरे, परिसर, आणि इतकी गर्दी बघून मी भांबावून गेले. सर्व गोष्टी नवीन आणि ग्रामीण भागातील मी मनात एक विचित्र भावनांचा कळवळ घेऊन शेवटच्या बाकावर जाऊन बसले. पहिल्या व्याख्यानासाठी डॉ. प्रा. प्रदीप सर वर्गामध्ये आले. वर्गावर नजर फिरवून झाल्यानंतर त्यांनी मला उभे करून पहिला प्रश्न विचारला, बोल बाळा काही अडचण आहे का? तुझा परिचय आम्हाला करून दे. आणि त्यांच्या त्या आपुलकीच्या शब्दांनी मला थोडा दिलासा आला. पुढे ते म्हणाले विद्यार्थी जीवनात भविष्याकडे तसं फारसं कोणी गांभीर्याने बघत नाही परंतु खरंतर हाच कालखंड खऱ्या अर्थाने भावी यशस्वी जीवनाची पायाभरणी करतो हे विसरून चालणार नाही . गांधीजी म्हणतात त्याप्रमाणे गुणवत्ता ही काही एका रात्री साथ देणारी गोष्ट नाही, त्यासाठी निरंतर प्रयत्न आवश्यक असतात. त्यानंतर त्यांनी त्यांचा विद्यार्थी ते प्राध्यापक हा प्रवास सांगितला . प्रदीप सर २०१४ पासून मुंबई विद्यापीठामध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू आहेत  त्यांचे पदयुत्तर शिक्षण भौतिकशास्त्र विषयातून शिवाजी विद्यापीठातून झाले. आणि त्यांनी पीएचडीची पदवी २०१० मध्ये हाँगकाँग युनिव्हर्सिटी साउथ कोरिया मधून घेतली आहे. त्यांच्या संशोधनाच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना सुवर्ण पदकाने नावाजले गेले आहे .तसेच Bk21 हा पुरस्कार देखील बहाल करण्यात आला. त्यांनी 60 पेक्षा जास्त रिसर्च पेपर मध्ये काम केले आहे. अत्यंत गरीब परिस्थिती मधून शिकलेले आमचे हे सर सर्व विद्यार्थ्यांसाठी आदर्श आहेत  . गरिबी हा शिक्षणामधील अडचण असू शकत नाही ती एक संधी असते आणि फक्त आत्मविश्वास , संयम ,चिकाटी, मनोबळ आणि जिद्द यांच्या बळावर हवे ते स्वप्न पूर्ण करता येते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे माझे आदर्श शिक्षक प्राध्यापक डॉक्टर प्रदीप सरवदे सर.

भौतिकशास्त्र शिकवावा तर तो प्रदीप सरवदे सरांनीच अशी ओळख असणाऱ्या सरांच्या चेहऱ्यावरील हसू आठवले

की नवीन गोष्ट शिकण्यासाठी मनोबल भेटते. ज्या विषयाशी विद्यार्थ्यांमध्ये भीती असते असा परमाणु भौतिकशास्त्र हा विषय खूप मनोरंजक किंबहुना अगदी सोप्यात सोप्या पद्धतीने सरांना शिकवला. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची सोयी संदर्भ पुस्तकांची व्यवस्था तसेच विषयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून वेगवेगळे परिसंवादाच्या कार्यक्रम देखील आयोजित करून ते नेहमी आम्हाला प्रोत्साहन द्यायचे."अभ्यास म्हणजे स्वप्नपूर्ती करण्यासाठी केलेला सर्वोत्तम प्रयत्न" असे समजून विद्यार्थ्यांनी कसोटीने अभ्यास करावा हा त्यांचा अट्टाहास! संतोष राहू नका सतत नवीन ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करा असे बोलून त्यांनी खूप कामे करून घेतली तेव्हा कंटाळा यायचा पण आत्ता तो अनुभव किती महत्त्वाचा आहे याची अनुभूती झाली की सरांचा चेहरा डोळ्यासमोर येतो. चांगला शिक्षकच मुलांना घडू शकतो आणि प्रत्येक शिक्षकाने अध्यापन हे व्यवसाय म्हणून नव्हे तर व्रत म्हणून स्वीकारलेले असावे या तत्त्वावर चालणारे आमच्या सरवदे सरांनी प्रत्येक क्षणाला त्यांच्या मार्गदर्शनातून आणि कार्यामधून दाखवून दिले.

योगायोगाने मला माझ्या संशोधन प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली त्यांनी माझ्या मधील क्षमता ओळखून मला संशोधन या क्षेत्रामध्ये पुढील वाटचालीसाठी समुपदेशन केले. पीएचडी साठी लागणारी पात्र परीक्षा पेट उत्तीर्ण करण्यासाठी त्यांनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांसाठी जादाचे तास घेतले. स्वतःच्या भावनांची व्यवस्थापन जर आपण योग्य प्रकारे करू शकलो तरच आयुष्य मध्ये योग्य पथावर पाऊल ठेवू शकतो हा त्यांचा शब्द! TIFR मध्ये माझ्या संशोधना मधील कार्य आणि पदवी उत्तर परीक्षण मधील घवघवीत यश यासाठी माझे सर्व प्राध्यापक रुंद व माझे आदर्श शिक्षक डॉक्टर प्रदीप सरवदे सर यांची भूमिका व मार्गदर्शन अमूल्य आहे. साऱ्या अलौकिक शक्ती माणसाच्या मनात असतात बर ! इच्छा शक्तीच्या बळावर जग जिंकण्याचा प्रयत्न करा तो नक्की सफल होणार असे सांगणारे आणि स्वतः उदाहरण असलेले आमचे सर कोणताही विद्यार्थ्यांचा का बरे आदर्श नसावेत? अनेक विद्यापीठातील मुलांना त्यांनी निस्वार्थपणे मदत केली आहे. संशोधनाचे प्रकल्प घेण्यासंबंधी मार्गदर्शन करणे, संशोधना बाबत त्यांच्या शंकांचे निरसन करणे व अभ्यासासाठी योग्य संदर्भ पुस्तकांबद्दल माहिती देणे ही मदत सरांनी आम्हाला केली तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये त्यांचे विद्यार्थी पाठी राहु नयेत म्हणून जास्तीचे तास घेणे, लिहिलेल्या व मुद्दांसकट महत्त्वाच्या नोंदी करून ते वेळोवेळी आम्हाला पुरवायचे. तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करत राहणे यात कोणताही स्वार्थीपणा नाही फक्त इमानदारी मध्ये काम करत राहा ही त्यांची शिकवण मी आयुष्यात कधीही विसरणार नाही सरवदे सरांनी आम्हाला जे सांगितले , ते आम्ही विद्यार्थ्यांनी ऐकले पाहिले आत्मसात करून अनुभवले त्यातून आम्हाला प्रेरणा मिळाली.

भौतिकशास्त्र बरोबरच आयुष्याचे व जीवनाचे शास्त्र शिकवणारे आमच्या आवडत्या व प्रेरणास्थान असणाऱ्या डॉ. प्रा. प्रदीप सरवदे सरांचा आदर्श आमच्यासमोर नेहमी राहील.



**श्रीमती. सायली महेंद्र जाधव**

**रोल न.१२**

# "माझे आर्दश शिक्षक"


**श्री.विलास कुरकुटे (सर)**

**शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, महालक्ष्मी**


शिक्षक म्हणजे ज्ञानाची मूर्ती असते. जी आपल्या समाजाला सुशिक्षित बनवते.प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाल शिक्षकांचे स्थान अनमोल असते. शिक्षक हे व्यक्तीच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग आहे.कारण व्यक्तीला घडवण्याचे कार्य हा शिक्षक करत असतो. शिक्षक हा देशाचा एक चांगला नागरिक घडवत असतो . त्याच्यामुळे समाजातील व्यक्तीचा मोठया प्रमाणात सामाजिक बदल घडून येतो. प्रत्येक व्यक्तीची आवड-निवड, विचार करण्याची क्षमता,आदर्श हे वेगवगळे असतात. शिक्षकांचे आचार-विचार एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या विचारांची जुळत असल,तर तो शिक्षक त्या विद्यार्थ्यांला आवडतो.आणि त्या शिक्षकाला तो आपले आदर्श मानतो.प्रत्येक विद्यार्थ्यांच्या एक ना एक आदर्श शिक्षक असतोच. तसे माझे आदर्श शिक्षक हे विलास कुरकुटे सर आहेत.

माझ्या शाळेचे नाव शासकीय माध्यमिक आश्रम शाळा महालक्ष्मी, ता. डहाणू जि. पालघर या टिकाणी डोंगराच्या पायथ्याशी आहे. अगदी निसर्गरम्य वातावरण आहे . शाळेमध्ये मी २००५ मध्ये पहिली ला प्रवेश घेतला. पहिली ते चौथी वर्ग उत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गामध्ये इयत्ता पाचवी मध्ये प्रवेश झाला तेव्हा मला कुरकुटे सर वर्गशिक्षक म्हणून लाभले मागच्या वर्षाप्रमाणे वर्गामध्ये हजेरी झाली. पाचवी  वर्गातील पहिला दिवस त्या दिवशी आम्हाला सरांनी सांगितले की वर्गात वेळेवर यायचे,वर्गखोलीची दररोज साफसफाई करायची, नियमित शाळेत यायचे, दिलेला गृहपाठ वेळेवर करायचा, वर्गाबाहेरील परिसरातील सफाई करायची,  सरांचे बोलणे एकुण  वाटलं की सर कडक शिस्त स्वाभावाचे आहेत.पण नंतर काही दिवसानंतर कळल की सरांचा स्वाभाव कडक नसून से खूप शिस्तप्रिय, वक्तशीरपण स्वभावाचे होते . कुरकुटे सर आम्हाला गणित विषय शिकवत त्याच्या शिकवण्याची पद्धत ही अगदी सरळ,सोपी व गमतीदार होती.ते शिकवण्यासाठी विविध साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना समावत असत. जो प्रयंत विद्यार्थ्यांना समजत नाही तो प्रयंत ते पुढे जात नाही. सुरुवातीला मला गणित, विषय आवडत नव्हता परंतू सरांच्या शिकवण्याची पद्धत ही अगदी सरळ  सोपी आणि पद्धतशीर होती की त्यानी शिकवलेला घटक डोक्यातच बसायचा.मुलांना कुठे समजणार  नाही ते त्यांना आधीपासूनच माहित असतं त्यामुळे ते खूप सोपे करून समजवत असत सरांचे शिकवणे हळूहळू आवडायला लागले.गणित विषयाची आवड निर्माण झाली. ते शिकवत असताना मुलांचा सहभाग घेऊन शिकवत असत.  गणिताची उदाहरणे देऊन ते मुलांना सोडवायला सांगायचे आणि त्यातील काही मुलांचे उत्तरे बरोबर असलेल्या मुलांना ते पुढे उभे करून दुसऱ्या मुलांची गणिते तपासण्यासाठी सांगत त्यामुळे विद्यार्थ्यांना गणितामध्ये रस वाढत गेला.

कुरकुटे सुरांचे व्यक्तीमहत्त्व हे खूप सरळ,साधा स्वभाव,प्रेमळ होता.शाळेतील गरजू मुलांना नेहमी मदत करतात.त्यांना स्वच्छतेची फार आवड होती. वर्गामध्ये आल्यानंतर ते वर्ग खोली साफ आहेत  का ? नाही याची खात्री करत असत.त्यासाठी  मुलांचे साफ-सफाई- चे मुलांमध्ये गट तयार केले होते. मुलांना ते शिस्त कशी लावायची ही सरांना चांगलेच माहित होतं. शिस्त लावणे म्हणजे शिक्षा करावीच लागते.त्याशिवाय मुलांमध्ये शिस्तीचे गुण रूजत नाही.त्यामुळे सर वर्गावर येण्याची चाहूल मुलांना झाली की मुले आपापल्या जागेवर जाऊन बसत आणि आपापला अभ्यास करत असत.

शनिवारी शाळेमध्ये आम्हा मुलांना  सकाळी कोवळ्या उन्हात पटांगणावर अभ्यासाला बसवत. तर कधी-कधी कवायत करण्यासाठी पटांगणावर नेत असत. काही कामानिमित्त ते बाहेर जात असतं त्यावेळस  मुलांची गडबड चालू असते परंतु सर येण्याची चाहूल मुलांना झाल्यावर मुले ज्याच्या त्याच्या जागेवर गप्प अभ्यास करत बसत. सरांची खोली ही शाळेच्या परिसरातच होती.म्हणून ते कधी-कधी खिडकीतूनच विद्यार्थ्यांचे निरिक्षण करून ते  हळूच येत जो विदयार्थी गडबड गोंधळ करत असत त्याला बरोबर शिक्षा करत असतं.सरांचे व्यक्तीमहत्त्व आतुन प्रेमळ, दुसऱ्यांना मदत करणारे होते. तसेच ते वेळेला महत्त्व देत . त्यांना साफसफाईची आवड होती. ते नेहमी विद्यार्थ्यांचे प्रगतीसाठी पोषक असणारे निर्णय घेतात. ते आम्हाला स्पर्धा परिक्षा तसेच खेळामध्ये सहभाग घेण्यासाठी प्रेरित करतात. मला आठवते की आमची घटक चाचणी सूर होणार होती, म्हणून आम्हा  विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर अभ्यास करण्यासाठी बसवले होते. तेव्हा मूले अभ्यास करण्याऐवजी क्रिकेट खेळत होती. सरांनी से पाहिले आम्हाला बोलवले आणि म्हणाले तुम्हाला अभ्यास करण्यासाठी बसवले होते, की खेळायला अशा शब्दात बोलून सर्व विद्यार्थ्यांना शिक्षा केली. त्यानंतर सरानी  आम्हाला त्यांनी घरून आणलेली कंदमुळे खायला दिली यामधून मला शिस्तीची सवय व सरांची विद्यार्थ्यांवरील प्रेम,दिसून आले .

शासकीय आश्रम शाळा असल्यामुळे मुलांची राहण्याची व्यवस्था ही शाळेतच असायची . सरांची खोली ही मुलांच्या खोलीच्या बाजूलाच होती. सरांचे मुलावर बारकाईने लक्ष असायचे ते अधून- मधून मुलांच्या खोलीवर बाहेरुन खिडकीतून नजर टाकायचे कधी-कधी तर मुलाला माहित सुद्धा होत नाही,की सर झाले होते. कारण सर जेव्हा खोलीवर असयाचे तेव्हा मुले  शांतपणे वेळेवर अभ्यास करत असत.वेळेवर जेवण्यासाठी मुलांना बोलवत . तसेच वेळेवर झोपण्याची सक्ती असायची. कुरकुटे सरांचे शाळेमधील सर्वच कारेक्रमामध्ये सहभाग असायचा कोणत्याही कार्यक्रमाला तयार असायचे त्यांना वेळेवर काम करणे आवडायचे. शाळेमध्ये शाळेच्या वेळेच्या आधी ते शाळेत यायचे तसेच ते वगोवर सुद्धा वेळेच्या आधी यायचे वर्गातील वर्गखोली साफ आहे की नाही याची खात्री करायचे.

वर्ग भरण्याच्या आधी ते आम्हाला १० मिनिटे वर्गाबाहेरील परिसराची साफसफाई करण्यासाठी सांगत. कुरकुटे सरांचे शाळेमध्ये खूप महत्त्व होते.ते कोणत्याही कामामध्ये पुढे असायचे त्यांनी शाळेमध्ये क्रिडा स्पर्धा,विविध स्पर्धा, स्कॉलरशिप स्पर्धा यामध्ये विदयार्थ्यांना मागदर्शन करून यश मिळवून दिले. सरांचे विचार हे विद्यार्थ्यांच्या  प्रगतीसाठी असायचे विविध प्रकारच्या विद्यार्थ्यांना येण्याची समस्या सोडवत असत, सरांचे व्यक्तीमहत्त्व हे शाळेपुरतेच मर्यादित नव्हते तर ते गावातील लोकांना सुद्धा आर्दश शिक्षक  म्हणून त्याचा मान राखला जातो. संराच्या अशा व्यक्तीमत्त्वामुळे मुलांमध्ये शिस्तीची सवय, स्वच्छतेची सवय , वेळेवर काम करण्याची सवय झाली.



नाव: नितेश रमेश चौर

हजेरी क्र: ०३

**एक चांगला शिक्षक आशा जागृत करून कल्पनेला प्रज्वलित करू शकतो.**

# "माझे आदर्श शिक्षक"



**श्री . नारायण खांडेकर**

**वर्गशिक्षक**

**श्री काळेश्वर हायस्कूल,चिमणगाव**

शिक्षक - शब्दाने ज्ञान वाढिवणारे
जगण्यातून जीवन घडिवणारे
मूल्यातून तत्वे शिकिवणारे
समाजाला योग्य दिशा दाखविणारे.

प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुला अमूल्य स्थान असते. आई वडील आपले पहिले गुरु असतात. तर शिक्षक हे दुसरे गुरु असतात.अशी महान ओळख असणारे माझे आदर्श शिक्षक म्हणजेच श्री .नारायण खांडेकर सर.माझे नाव प्रतिभा तुकाराम जाधव. आमच्या बी. एड. कॉलेजमध्ये जेव्हा आदर्श शिक्षक निबंध स्पर्धा आयोजित केली तेव्हा मला समोर चित्र उभे राहिले ते आमच्या खांडेकर सरांचे. अत्यंत मनमिळावू, प्रेमळ, मैत्रीपूर्ण असा त्यांचा स्वभाव परंतु तितकाच शिस्तप्रिय सुद्धा. ते आमच्या वर्गाचे वर्गशिक्षक होते. ते आम्हाला इंग्रजी हा विषय शिकवायचे. इंग्रजी म्हटले की भिती वाटायची, पण सरांनी तो इतक्या सहजतेने व सोप्या पद्धतीने शिकवला. इंग्रजी ग्रामर शिकवण्यासाठी ते शाळा सुटल्यावर एक तास जास्तीचा घ्यायचे.

जी मुलं अभ्यासात हुशार नाहीत त्यांच्यावर सरांचे विशेष लक्ष असायचे. ते मुलांना नेहमी प्रोत्साहन द्यायचे. सरांना स्वच्छतेची फार आवड होती. शाळेचा गणवेश हा स्वच्छ घालून यायचा असा त्यांचा अट्टाहास असायचा. मला आजही आठवतंय त्यांचे हस्ताक्षर हे मोत्यासारखे होते. त्यांना विषयाच्या वह्या ह्या नेटनेटक्या सुंदर हस्ताक्षरामध्ये लिहिलेल्या आवड्याच्या. त्यासंबंधी ते शेरे पण द्यायचे.सर शिस्तीच्या बाबतीत खूप कडक होते. खांडेकर सर आले म्हटले की वर्गात शांतता असायची. त्यांचा तास संपेपर्यंत कोणीही वर्गात कारणाशिवाय बोलत नसे. रोजच्या रोज स्पेलिंग पाठ करून घ्यायचे. एक शब्द चुकला की पाच छड्या असा त्यांचा नियम होता. पण त्यामुळे सर्व शब्द पाठ व्हायचे. म्हणतात ना - छडी लागे छमछम, विद्या येई घमघम.

खांडेकर सर चांगले शिकवत तर होतेच पण त्याबरोबर जीवनावश्यक अनेक मूल्य मुलांना सांगत असत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याच्याकडे त्यांचे पूर्ण लक्ष असायचे.

सुरुवातीला मला त्यांची भीती वाटायची. ते रस्त्याने जरी दिसले तरी मी साईड बदलून दुसऱ्या साईडला जायचे पण हळूहळू मला त्यांच्यातील आत्मीयता पाहून माझ्या मनातील भीती दूर झाली. त्याचबरोबर इंग्रजी विषयाची देखील भीती कमी झाली. सर सर्व गरीब मुलांना मदत करायचे.

माझे सर माझ्यासाठी नेहमी आदर्श राहतील. आज माझ्यात जे चांगले गुण आहेत ते फक्त सरांमुळेच. आज त्यांनी मला शिकवलेल्या चांगल्या गोष्टी, संस्कार मी कधीच विसरू शकणार नाही. सरांची बदली खूप वेळा झाली पण आमच्या गावातील लोकांनी ती रद्द केली. शेवटी सर चिमणगावमध्ये रिटायर्ड झाले. असे माझे आदर्श शिक्षक खांडेकर सर .

पर्वत असतील अनेक पण...
हिमालय ही शान आहे,
वृक्ष असतील अनेक पण...
चंद्रमाला मान आहे,
खूप भेटले गुरु पण...
माझ्या जीवनात खांडेकर सर तुम्हाला अढळ स्थान आहे.



**श्रीमती प्रतिभा तुकाराम जाधव**
**हजेरी क्रमांक - ११**

**शिक्षक हा समाजाचा अभियंता आहे.**
**शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या मनाचा शिल्पकार आहे.**

# " माझे आदर्श शिक्षक "



**कै. संतोष दामोदर पाटील सर.**

**गुरुकुल विद्यालय, सावदा.**

जे घडवतात, शिकवतात....
भविष्य आपले सावरतात.
बळ पंखात देऊनी.....
गरुड झेपचे वळण लावतात.

कुंभार घडवितो घटास.....
तसे गुरुठायी घडतो आपण.
काय किती दिले आपणांस.....
अशक्य आहे मापन.

ज्ञानाचा अथांग सागर...
म्हणजे आपले गुरु.
पृथ्वीतलावरचे ईश्वर....
म्हणजे आपले गुरु.

महिमा त्यांची अगाध...
सांगाया शब्द अपुरे पडती.
गुरुविन जीवन म्हणजे...
जग हे सारे सुने.

शिक्षक हा आपल्यासाठी देवाचा विशेष आशीर्वाद आहे. शिक्षक असे व्यक्ती आहेत जे एक चांगले राष्ट्र निर्माण, करतात आणि जगाला एक चांगले स्थान बनवतात. ते लोकांचे जीवनमान उंचावत असल्याने त्यांना समाजात खूप आदर अहे. एक आदर्श शिक्षक हा मित्रासारखा असतो जो आपल्या सर्व संकटात मदत करतो. एक आदर्श शिक्षक त्यांची वैयक्तिक शिक्षण प्रक्रिया तयार करतो जी अद्वितीय असते आणि मुख्य प्रवाहात नसते. त्यामुळे विद्यार्थी हा विषय चांगल्या पध्दतीने शिकतात.

आणि माझे मोठे नशीब म्हणजे आम्हाला मिळालेले संतोष पाटील सर हे आम्हाला इंग्लिश विषय शिकवायचे म्हणजेच आम्ही संतोष पाटील सर यांच्याकडे इंग्रजी या विषयाची ट्युशन लावलेली होती. संतोष पाटील सर हे आमचे शाळेचे किंवा महाविद्यालयाचे सर नसून हे आमचे ट्युशनचे सर होते. आम्ही जेव्हा शाळेमध्ये असताना आम्हाला इंग्लिश काही यायचे नाही तर आम्ही गुरुकुल विद्यालयाची संतोष पाटील सर आमच्या गावातच राहायचे आणि आम्ही विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे ट्युशन लावली. आम्हाला इंग्रजी काहीच येत नव्हतं त्यावेळी आम्हाला संतोष सरांकडे ट्युशन लावून इंग्रजीमध्ये बोलायचे होते आणि इंग्रजी भाषा आणि व्याकरण हे समजून घ्यायचं होतं त्यासाठी आम्ही सगळ्यांनी मिळून त्यांच्याकडे ट्युशन लावले त्यावेळी मी आठवीमध्ये होते. आठवी मध्ये असताना संतोष पाटील सर आमची ट्युशन सकाळी पाच वाजता घ्यायची त्यावेळी आम्हाला सकाळी उठायचं खूप कंटाळा यायचा तरीपण सर आम्हाला सकाळी पाच वाजेला बोलवून घ्यायचे आणि आमच्याकडून इंग्रजीमध्ये बोलण्याचा सराव करून घ्यायचे तसेच इंग्रजीचे व्याकरण मध्ये मध्ये इंग्रजी मध्ये स्पर्धा घ्यायचे. आम्ही सकाळी पाच वाजेला जाऊन इंग्रजीची ट्युशन करायचे सकाळी पाच वाजता उठणे म्हणजे आम्हाला खूप जड जायचं, आम्ही जेव्हा सकाळची ट्युशन पाच वाजेला असायची त्यावेळी काही दिवस तर सकाळी पाच वाजेला आम्ही गेलोच नाही ठराविक एक दोनच विद्यार्थी जायचा आम्ही सकाळी लवकर उठण्याचा कंटाळा करायचं त्यावेळी सरांनी आम्हाला बोलवून घेतले आणि योग्य ते मार्गदर्शन केले त्यावेळी म्हणायचे की जर तुम्ही सकाळी लवकर उठून अभ्यास कराल तर तुमच्या स्मरणात राहील आणि तुम्हाला योग्य वळण लागेल त्याचप्रमाणे आम्ही सकाळी उठून पाच वाजता ट्युशनला जायचे आधी आधी थोडं जड जायचं पण सराव करता करता सवय होऊन गेली. असे संतोष सरांनी आम्हाला योग्य ते वळण लावायला सुरुवात केली आणि आम्ही विद्यार्थ्यांनी ती हळूहळू अमलात आणण्याची ही सुरुवात केली.

इयत्ता आठवी मध्ये असताना इंग्रजीची ट्युशन मध्ये जात असताना त्यावेळी एक वेळेस अशी परिस्थिती होती की मी सरांच्या ट्युशनची फी देऊ शकले नाही तर मी बरेच दिवस ट्युशनला गेली नाही तर त्यांनी मला ट्युशन मध्ये बोलवून घेतले आणि तू का बरं ट्युशनला येत नाहीस याचे कारण विचारले त्यावर मी त्यांना सांगितले की सर यावेळेस आमच्या घरची परिस्थिती खूप हलाखीची आहे त्यामुळे मी ट्युशनला येऊ शकले नाही आणि ट्युशनची राहिलेले पैसे मी काही दिवसांनी तुम्हाला आणून दे. यावर संतोष सर बोलले की मी फक्त पैशांसाठी शिकवत नाही तर जसं मला इंग्रजी बोलायला येते वाचायला येते व्याकरण मध्ये त्याचप्रमाणे माझ्या विद्यार्थ्यांना सुद्धा इंग्रजी यायला पाहिजे हेच माझं स्वप्न आहे . संतोष सरांना माझ्या घरच्या परिस्थितीबद्दल सांगितल्यावर त्यांनी मला उद्यापासून परत ट्युशनला ये म्हणून सांगितले आणि मी परत दुसऱ्या दिवसापासून ट्युशनला जायला लागले. ट्युशन मध्ये असताना त्यांनी आम्हाला इंग्रजीमध्ये खूप काही शिकवले आणि आमच्याकडून योग्य तो सरावही करून घेतला. ते खूप कठोर आणि शिस्तप्रिय, होते, त्याचप्रमाणे प्रेमळ आणि सतत उत्साही असायचे. संतोष पाटील सर मनापासून प्रत्येक विदयाथ्यार्थ्यांचे समाधान होईपर्यंत ते आम्हांला समजावून सांगायचे. त्यांची शिकवण्याची पध्दत खूप चांगली असायची. त्यांचे प्रत्येक प्रकरणाचे विदयार्थ्यांना सोपे होईल असे स्पष्टीकरण आणि सुरेख विचार यामुळे आम्ही त्यांचे शिकवणे लक्षपूर्वक ऐकायचो. ते एक मेहनती शिक्षक आहेत. माझ्या आयुष्यातच माझा आदर्श शिक्षक म्हणून मी संतोष पाटील सरांना नेमले. कारण शिक्षक हा विद्यार्थ्याचा शिल्पकार असतो.

इंग्रजी शिकायची आहे म्हणजेच आठवते ते म्हणजे संतोष पाटील सर आमच्या पूर्ण गावामध्ये सरांकडे विद्यार्थ्यांची एवढी गर्दी असायची की मुलांना बसायला सुद्धा जागा नसायची त्यामुळे सरांना आम्हा विद्यार्थ्यांसाठी दुसरी भाड्याची खोली घ्यावी लागली होती गावामध्ये खूप मुले ही खूप गरीब घरातली होती त्यामुळे त्यांच्याकडे दरवेळेसची ट्युशन फी द्यायला जमत नसायचे तरीसुद्धा संतोष पाटील सर हे विद्यार्थ्यांना पैशांबाबत कधीच बोलत नसायचे आणि सर्व विद्यार्थ्यांना हसून खेळून रागावून तर कधी मार देऊन आम्हाला थोडी का होईना पण इंग्रजी हा विषय खूप प्रेमाने शिकवायचे आणि त्यामध्ये आम्हाला कधी असं वाटलंच नाही की हा खूप कठीण विषय आहे काही मुलांकडून पैसे देण्यास न जमल्यास संतोष पाटील सर त्यांना हक्काने सांगायचे की हे तुमचं घरच आहे तुम्ही केव्हाही या केव्हाही जा तुम्ही ट्युशनला अशाप्रकारे ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करायचे आणि योग्य तो सल्लाही द्यायचे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यामध्ये जर काही अडथळे आले किंवा काही समस्या आल्या तर मुलं ही आवर्जून सरांना सर्व सांगायची त्यावेळेस

स्थायिक होते म्हणजे जेथे ते शिक्षक म्हणून काम करत होते गुरुकुल विद्यालय सावदा येथे तेथेही त्यांनी किती प्रेम मिळत असेल हे आम्हाला सांगता येत नाही कारण ते एवढे शिस्तप्रिय आणि प्रेमळ होते. आयुष्यामध्ये मला माझ्या शिक्षणाचे मार्गदर्शन संतोष पाटील सर यांनी केले. मला कोणत्याही विषयाची शंका असली तरी ते विद्यार्थ्यांना मदत करायचे . माझ्या आयुष्यातले अविस्मरणीय शिक्षक संतोष पाटील सर आहेत.

आठवी मध्ये असताना आम्ही संतोष सरांकडे ट्युशनला जायचं नंतर धीरे धीरे आम्ही नववीत गेलो दहावीत गेलो कॉलेजला जायला लागलो तेव्हापासून आमच्या कॉन्टॅक्ट त्यांच्याशी कमी होऊन गेला पण आठवण मात्र नेहमी यायची जेव्हा मी ग्रॅज्युएशन करत असताना एक दिवस अचानक मैत्रिणीचा फोन आला आणि मैत्रीण मला सांगायला लागली की संतोष सर आता नाही आहे. त्यावेळी मला खूप धक्काच बसला आणि काही कळेनासे झाले की असे कसे होऊ शकते त्यांची वय हे 42 असे होते त्यांना विद्यालय मध्ये असताना अचानक श्वास घेण्याचा त्रास व्हायला लागला आणि अचानक त्यांच्या छातीत दुखायला लागले त्यामुळे ते तिथेच मृत पावले. माझ्या मैत्रिणीने हे मला सर्व सांगितल्यावर माझा तर विश्वासच बसेना की हे असं कसं घडलं. आता सुद्धा ही त्यांचं नाव घेतल्यास डोळ्यात पाणी येते कारण असे शिक्षक होणे शक्य नाही त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना खूप मदत केली आणि योग्य ते मार्गदर्शन करून सल्ला देऊन विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवला फक्त अभ्यासाच्याच बाबतीत नव्हे तर वैयक्तिक बाबतीत मुला मुलींचे आमचे सर्व समस्या सोडवत होते आणि यामुळे संतोष पाटील सर आमचे खूप प्रिय सर होते ते फक्त आमचे सरच नव्हते तर आम्ही सर्व विद्यार्थ्यांचे ते एक जवळचे मित्र होते आणि आमच्या आयुष्यामध्ये आम्ही सर आणि एक खूप शिस्तप्रिय आणि प्रेमळ मित्र गमवला याचे खूप वाईट वाटायचे.



स्नेहलता राजेंद्र पाटील.

हजेरी क्रमांक - २९

" शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनातील खरा मार्गदर्शक असतो. "

Full text: 6994

## माझे आदर्श शिक्षक



**श्री.जयवंत भिमराव काळे**

**महादेई पनमेश्वरी दास जिंदल हायस्कूल न्याहाळे बुद्रुक ता.जव्हार जि.पालघर**

‖ गुरुर्ब्रहमा गुरुर्विष्णुः गुरुदेवो महेश्वरः । गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ‖

कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देवून त्यापासून सुंदर मडके घडवतात,त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला सुरेख आकार देण्याचे महान कार्य शिक्षक करतात. आई ही प्रत्येकाचा पहिला गुरु असते. त्यानंतर प्रत्येकाला घडवण्याचे महान कार्य शिक्षक करतात. मला माझ्या आईवडिलाप्रमाणेच घडवण्याचे कार्य माझ्या गुरुनी केले. त्यातील मला सर्वात जास्त भावलेले व्यक्तीमत्व म्हणजे माझे काळे सर होय. मला माझे शालेय शिक्षण घेतांना प्रत्येक शाळा, कॉलेज,महाविद्यालय इ. ठिकाणी सर्व दर्जेदार असे शिक्षक-शिक्षिका लाभले होते. मी आता वर्तमान परिस्थितीमध्ये ज्या ठिकाणी शिक्षण घेत आहे आणि माझ्यात झालेला बदल हा त्या सर्व गुरुवर्यांमुळे आहे.

माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा टप्पा म्हणजे इयत्ता दहावी हा वर्ग होता. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षामध्ये आमच्या वर्गाचे वर्गशिक्षक म्हणून लाभले होते. काळे सर हे संस्थेतील हिंदी विषय प्रमुख म्हणून कार्यरत होते. शाळेची ओळख ही त्या शाळेच्या इमारती पेक्षा त्या शाळेच्या गुणवत्तेवरुन ओळखली जाते. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षातील इयत्ता दहावी निकाल हा फक्त ३५% लागला आणि म्हणूनच हायस्कूलचे शिक्षक बदली होऊन नवीन शिक्षक आले. काळे सरांचा स्वभाव हा विनम्रपणा,निष्ठावान,विषयावरील प्रभुत्व,निःपक्षपातीपणा,आपल्या विषयावरील निष्ठा,प्रभावी व प्रसन्न व्यक्तिमत्त्व,संशोधक वृत्ती अशा विविध गुणांनी परिपूर्ण असे व्यक्तिमत्व होय. सरांचे संस्थेतील शिक्षक म्हणून कार्य करत असताना प्रत्येक वर्षी बदली होत असते. असा उल्लेख सरांच्या स्वागत कार्यक्रम केलेला होता. सर हे हिंदी विषयातील दहावी बोर्डाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका काढत होते. त्यांचा चेहरा बघितला तरी त्यांच्या तेजाची अनुभूती मिळत असे. त्यांचे व्यक्तिमत्त्व मनाला हुरूप लावे. त्यांची शिकविण्याची पद्धत सर्व विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेत होती. सर शिकवत असताना सर्वांना प्रश्न विचारत,त्या घटक,घटनेविषयी विचार करून बोलायला सांगायचे. सरांचा विशेषतः म्हणजे सर हिंदी, इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय शिकवत असताना त्या पाठ्यपुस्तकात आलेली जास्तीत-जास्त ठिकाणे सरांनी प्रत्यक्ष जाऊन बघितलेली होती. आम्हाला वर्गात सर आसाम राज्यात जाऊन आलेले छायाचित्रे दाखविली होती. तसेच सरांनी मागील वर्षीच्या प्रश्नपत्रिका संच आणि योगायोगाने त्यांच्या मुलीसाठी घेतलेले शैक्षणिक साहित्य आम्हाला दिलेले होते. सरांच्या मार्गदर्शनामुळे आमचा सराव उत्तर होत गेला. सरांचा स्वभाव जेवढा प्रेमळ पण वेळोवेळी सरांनी दिलेला अभ्यास केला नाही तर सर रागवायचे,शिक्षा करायचे आणि थोड्या वेळाने पुन्हा त्या अभ्यासा संदर्भात समजून सांगायचे.

एका वर्षात सरांनी विद्यार्थ्यांमधील एक उत्तम विद्यार्थी घडविण्यासाठी विद्यार्थीच्या सर्व अडचणी वेळोवेळी सोडवित असत. त्यांना काय कमी पडते, याची माहिती मिळवून पुन्हा त्यांना मार्गदर्शन करणे, अशी सरांची आगळीवेगळी पद्धत होती. सर सुरुवातीला वर्गात घटक घेत आणि नंतर तोच घटक आय.सी.टी कक्षात प्रोजेक्टरवर्ती लावून शिकवत होते. म्हणून तो घटक लक्षातच बसायचा. या सर्व परिश्रमाने हायस्कूलचा हिंदी विषयाचा निकाल १००% लागला आणि हायस्कूलचा सर्व निकालही १००% लागला. योगायोगाने की माझ्या मेहनतीने मी वर्गात प्रथम आलो. काळे सरांनी १० वी वर्गात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हस्ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी ध्वजारोहण करायचे असा उपक्रम राबविण्याचे मुख्याध्यापक सरांना सुचवले. या उपक्रमामुळे विद्यार्थी एकमेकांसोबत स्पर्धा करतील व प्रथम येण्याचा प्रयत्न करतील. या उपक्रमामुळे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहण करण्याची संधी मला मिळाली होती. सोबत माझे वडील, हायस्कूलचे मुख्याध्यापक,शिक्षक,गावातील वरिष्ठ व्यक्ती,सर्व विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते. यावेळी एक विद्यार्थी म्हणून माझ्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट होती. कदाचित सरांच्या व्यक्तीमत्वातील काही पैलू मी जाणून शकलो नसेल.

खुप-खुप धन्यवाद ! काळे सर तुम्ही माझ्या आयुष्यात उत्तम शिक्षकाची छाप निर्माण केली. आता दोन दिवसांपूर्वी सरांना फोन केला असता सरांनी नम्रपणे माझ्या सोबत संवाद साधला आणि चालू असलेल्या शिक्षणात यश मिळावे यासाठी शुभेच्छा पण मला दिल्या. पुन्हा एकदा धन्यवाद सर तुम्ही दिलेल्या ज्ञान, शिस्त, जबाबदारीची जाणीव,भाव-भावना यांचा मी सदैव ऋणी असेल .



श्री.अंकुर धर्मा गोविंद

हजेरी क्रमांक :- १०

**ध्येयाकडे नेतो,सत्य शिकवतो,वदवून घेतो आणि ज्ञानाची ओळख म्हणजे शिक्षक.**

# शिक्षक म्हणजे...

शिक्षक म्हणजे विशाल वृक्षच असतो
ज्याच्याफांदी फांदीतून सळसळत असतात
बेदरकारपणे ज्ञानाची पानं
त्याच्याच छायेखाली सौख्य लाभते
अज्ञानाच्या उन्हात न्हाऊन निघालेल्या
अस्फुट चित्रकाराला किंवा
त्याच्याच रेषेखाली अधांतरी लटकेली असतात
कित्येक भावनांच्या डोहात भिजून
नतमस्तक झालेली इवलाल्या चेहऱ्याची निरागस अक्षरे
शिक्षक नसतो कधीच बिचारा
तोच तर असतो सर्वस्वी बादशहा शाळेचा
त्याच्याच स्वमीत्वाने महत्व येत असते शाळेला
तोच तर असतो खरा संशोधक, शास्त्रज्ञ
अंधार भरलेल्या चिमूकल्या गोळ्यातून
सूर्याचं तेज बाहेर काढणारा
तो समाज सुधारक क्रांती कारकही तोच
कित्येक चेतनांना पाठबळ असते
त्याच्या समर्थ तत्त्वज्ञानाचे
शिक्षकाला जपावी लागतात
कुतूहलाच्या झाडाची पानं जीवापाड
आणि आकार द्यावा लागतो
एका मुक्त पणे बागडणाऱ्या निराकार चैत्यनाला...
कधी स्वतःला विसरून बागडावं ही लागतं
जाणून घ्यावी लागतात बोल
खोल खोल काळजाच्या आत निर्ममपणे...
कधी अंधारही प्यावा लागतो बेभानपणे
तेव्हा कुठे चमकतात उजेडाची किरणं उद्दीष्टांच्या वाटेवर
त्याच्या सोबतीला असतेच की खडूची धारदार तलवार अन्
फळ्याची ढाल असते पाठीशी
विश्वास ठेवा एक ना एक दिवस अंधार संपून उजेडाचे राज्य येईल.
अन तेंव्हा मात्र शिक्षक म्हणून त्याची प्रतिमा अधिक स्पष्ट दिसेल

5:41 pm